दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ७ वे अंक –३५ | मंगळवार दि.१३ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-7th | Issue- 35 | Tuesday, Dt.13 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# अखेर विद्यार्थ्यांच्या आंदोलनापुढे सरकार नमले!

## भीमनवार सक्तीच्या रजेवर, तुकाराम मुंडेंकडे चौकशीची जबाबदारी

पुणे / मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील अनियमितते विरोधात पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला. तसेच कथित पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांची या समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सरकारकडून मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी जल्लोष करत आंदोलन स्थगित केले.११ दिवसांच्या आंदोलनाने

पान २ वर...









## ११ दिवसांच्या संघर्षानंतर एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित, चौकशी समिती, भरती आणि परीक्षा पद्धतीत बदलांचे आश्वासन

### ‘एमपीएससी अध्यक्षांना अखेर जावे लागले’, भ्रष्टाचाराची संपूर्ण चौकशी व्हावी – राहुल गांधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठविण्याच्या निर्णयाचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.राहुल गांधी यांनी १२ ऑक्टोबर रोजी समाज माध्यमांवरील ‘एक्स’ या व्यासपीठावर प्रतिक्रिया देताना, एमपीएससी अध्यक्षांना अखेर पदापासून दूर व्हावे लागले असून आता भ्रष्टाचाराची संपूर्ण चौकशी करावी असे म्हटले. हा विद्यार्थ्यांचा, तरुणांचा आणि सत्याग्रहाचा मोठा विजय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### ‘राजीनामा हवा होता केवळ रजा नको, आंदोलन स्थगितीवर मूळ तक्रारदार ऋषिकेश गांगुर्डे नाराज

एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटीचा मुद्दा पुढे आणणारे मूळ तक्रारदार ऋषिकेश गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा ही प्रमुख मागणी होती मात्र त्यांना केवळ रजेवर पाठवण्यात आल्याने आपले समाधान झालेले नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. गांगुर्डे यांच्या म्हणण्यानुसार, अध्यक्षांचा राजीनामा होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवायला हवे होते. भीमनवार रजेवर गेले असले, तरी ते पुन्हा पदावर येऊ शकतात. त्यामुळे केवळ रजेच्या निर्णयाने प्रश्न सुटणार नाही, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. आंदोलनाच्या मागण्यांशी संबंधित चर्चेच्या मसुद्यात राजीनाम्याच्या मुद्द्याचा समावेश नसल्याने आपण आंदोलनातून आधीच माघार घेतली होती, असेही त्यांनी स्पष्ट केले.आंदोलन स्थगित करण्याच्या निर्णयानंतर पुढील भूमिका ठरवण्यासाठी विद्यार्थ्यांशी चर्चा करणार असल्याचे गांगुर्डे यांनी सांगितले. दोन दिवसांत अहिल्यानगर येथे पत्रकार परिषद घेऊन पुढील दिशा स्पष्ट करण्याचा त्यांचा मानस असल्याचे वृत्त आहे. गांगुर्डे यांच्या नाराजीमुळे आता या प्रकरणात दोन मुद्दे महत्त्वाचे ठरत आहेत: चौकशी निष्पक्षपणे पूर्ण होणार का आणि अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी न मान्य झाल्याने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची पुढील दिशा काय असेल ? हे लवकरच स्पष्ट होईल.

## माध्यम स्वातंत्र्यावरील हल्ल्याचा निषेध.!

## लोकशाही वाचवा –देश वाचवा !

### अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्त्यांची निदर्शने – डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांना अडवणे, त्यांना ताब्यात घेणे, पोलिसांकडून मारहाण व दडपशाही केल्याचे आरोप तसेच आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांशी गैरवर्तन, प्रेस कार्ड दाखवुनही ताब्यात घेऊन गाडीत टाकणे या माध्यमांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ आज दि.१२ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे




लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा संविधानिक अधिकार आणि माध्यम स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचा आरोप करत, सरकारच्या अघोषित आणीबाणीच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंदोलकांनी 'हुकूमशाही चालणार नाही', 'लोकशाही वाचवा,

पान २ वर...

### शॉर्टसर्किट होऊन खाली कापून ठेवलेल्या सोयाबीनच्या

## गंजीस आग लागून जळून खाक झाल्याने यात

## शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान



मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

दुष्काळामुळे मराठवाड्यातील शेतकरी होरपळला गेला असताना ऐन दसऱ्याच्या तोंडावर शुक्रवारी परतपूर शिवारात मेन लाईनवर शॉर्टसर्किट होऊन खाली कापून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीस आग लागून जळून खाक झाल्याने यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे या शेतकऱ्याचे संसार उघड्यावर पडल्यामुळे तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

मुखेड तालुका हा डोंगराळ भाग असल्यामुळे दरवर्षी याठिकाणी पर्जन्यवृष्टी कमीच होते.यावर्षी तर जून मध्ये पेरणी योग्य पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्या वेळत झाल्या होत्या पण पिके ऐन बाहारात असताना पावसाने मोठा खंड दिल्याने सोयाबीन सह आधी पिकांना याचा मोठा फटका बसला यामुळे सोयाबीन उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे दिसून येत आहे.सध्या मुक्रमाबाद सह परिसरात उरली सुरली सोयाबीनची कापणी जोरात चालू आहे.पण मजूरदार प्रति बॅग पाच ते साडेपाच हजार रुपये

पान २ वर...

## आईच्या कष्टांना मिळाले यशाचे लेणे!

### मजुरी करून मुलाला शिकवले, शेख अलीमची एमएसएफमध्ये निवड झाल्याबद्दल

## पोलीस अधीक्षकांनी केले अभिनंदन..!!

बीड ।प्रतिनिधी

जिद्द, मेहनत आणि आई–वडिलांच्या त्यागाच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, याचा प्रत्यय शेख अलीम जलील या युवकाने दिला आहे. अतिशय सामान्य परिस्थितीतून पुढे येत त्याने एमएसएफमध्ये निवड मिळवली आहे. त्याच्या या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गावातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने त्याचा विशेष सत्कार बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते करण्यात आला.



शेख अलीमचे वडील शेख जलील बाबुमिया आणि आई शेख कौसर बानो जलील यांनी प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा संसार सांभाळला. विशेषतः आईने मजुरी करून आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी कष्ट घेतले. स्वतःच्या श्रमांची पर्वा न करता मुलाला चांगले शिक्षण मिळावे आणि त्याने आयुष्यात स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आईच्या घामातून आणि कुटुंबाच्या त्यागातून उभ्या राहिलेल्या या स्वप्नाला आता यशाची किनार लाभली आहे.शेख अलीमच्या या यशाची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या शुभहस्ते त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यांच्या हस्ते झालेल्या या

पान २ वर...

## बीडमध्ये १६ ऑक्टोबर रोजी रिपाइंचे विराट

## निळे वादळ सरकारची झोप उडवणार..!

### मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर,विद्यार्थ्यांसह वंचित घटकांच्या प्रश्नांवर सत्ताधारी रिपाईचे होणार सरकारच्याच विरोधात भव्य शक्तिप्रदर्शन..!

बीड / प्रतिनिधी

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, तसेच बीड जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या उपस्थितीत शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी बीड शहरात विराट जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेच्या माध्यमातून रिपब्लिकन पक्ष आपली ताकद दाखवणार असून, दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांवर शासनाचे लक्ष



वेधण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष या विराट सभेचे आयोजक पप्पू कागदे यांनी दिली.

बीड येथील हॉटेल नीलकमल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेला रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी संबोधित केले. यावेळी रिपाईचे बीड जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, जिल्हा उपाध्यक्ष बापू पवार, तालुकाध्यक्ष किसन तांगडे, शहराध्यक्ष

पान २ वर...

### दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा संकल्प..

दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी धान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याचाही पक्षाचा मानस असल्याची माहिती देण्यात आली. दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात, शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळावी आणि वंचित घटकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, या मागण्यांसाठी सभेतून आवाज उठविण्यात येणार आहे.या विराट जाहीर सभेचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे युवा प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कराळे यांच्या पुढाकारातून करण्यात येत आहे. सभेला पक्षाचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, युवक, विविध सामाजिक घटकांचे प्रतिनिधी आणि जिल्हाभरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

## संपादकीय....

# परीक्षेतील पारदर्शकता हा उपकार नव्हे, विद्यार्थ्यांचा अधिकार.!

बीड / संपादकीय....

एमपीएससी परीक्षांमधील कथित पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनात आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर काही मागण्यांबाबत आश्वासने मिळाली, तरी देखील १२ ऑक्टोबरपर्यंत आंदोलन सुरूच आहे हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

सरकारने हे समजून घेतले पाहिजे की, परीक्षेतील पारदर्शकता ही कोणत्याही सरकारने विद्यार्थ्यांवर केलेली कृपा नाही. ती त्यांच्या कष्टांच्या न्याय्य मोबदल्याची पूर्वअट आहे. परीक्षेची घोषणा झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन करायचे, आर्थिक खर्च उचलायचा, परीक्षा द्यायची आणि नंतर अनिश्चिततेच्या गर्तेत अडकून पडायचे, हा प्रकार किती काळ चालणार ? कथित गैरव्यवहारांची चर्चा निर्माण झाली की, केवळ चौकशी जाहीर करून चालणार नाही. चौकशी निष्पक्ष असली पाहिजे, दोषींवर पुराव्यांच्या आधारे कारवाई झाली पाहिजे आणि भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी ठोस व्यवस्था उभी केली पाहिजे. अन्यथा प्रत्येक नव्या परीक्षेसोबत जुन्याच शंका पुन्हा डोके वर काढतील.चौकशीची घोषणा ही सुरुवात असू शकते पण विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा संपादन करणे हेच सरकार समोरील खरे आव्हान आहे.

तरुणांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका.!

महाराष्ट्रातील तरुणाईला सरकारी नोकरीचे आकर्षण आहे, पण त्यामागे केवळ पद, प्रतिष्ठा किंवा पगार नसतो. अनेक विद्यार्थ्यांसाठी सरकारी नोकरी म्हणजे घरातील गरिबीशी लढण्याचे साधन, शेतकरी कुटुंबाला आर्थिक आधार आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी असते.मराठवाडा, विदर्भ आणि ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना या संघर्षाची तीव्रता अधिक जाणवते. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, शहरातील महागडे शिक्षण आणि स्पर्धेचा वाढता ताण यांच्याशी झुंज देत हे विद्यार्थी अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. अशा वेळी परीक्षा प्रक्रियेतील अनिश्चितता त्यांच्यासाठी केवळ प्रशासकीय अडचण राहत नाही; ती त्यांच्या आयुष्याच्या नियोजनावर परिणाम करणारी बाब ठरते.विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले, उत्तर मागितले किंवा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला म्हणून त्यांना दोषी ठरवणे योग्य नाही. आंदोलन शांततापूर्ण असावे, सार्वजनिक जीवन विस्कळीत होऊ नये आणि कायद्याचे पालन व्हावे, ही अपेक्षा रास्त आहे. मात्र, या अपेक्षांची अंमलबजावणी करताना प्रशासनानेही संयम, संवेदनशीलता आणि संवादाची भूमिका स्वीकारली पाहिजे.आंदोलनातील प्रत्येक विद्यार्थ्याची मागणी सारखी असेलच असे नाही. परीक्षा पद्धतीबाबतही विद्यार्थ्यांमध्ये मतभेद असू शकतात. पुण्यात आंदोलनाचे वेगवेगळे गट वेगवेगळ्या मागण्यांसह सक्रिय असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे सरकारने सर्व मागण्यांची स्वतंत्रपणे छाननी करून, कोणत्या मागण्या तातडीने मान्य करता येतील, कोणत्या मागण्यांसाठी प्रशासकीय सुधारणा आवश्यक आहेत आणि कोणत्या बाबी कायदेशीर चौकटीत तपासाव्या लागतील, हे स्पष्ट केले पाहिजे.

आश्वासनांची नव्हे, कालबद्ध कृतीची गरज.!

सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतली असेल, तर त्या भूमिकेचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, प्रत्येक आंदोलनानंतर बैठक, निवेदन, आश्वासन आणि त्यानंतर पुन्हा आंदोलन, असे चक्र सुरू राहणे राज्याच्या प्रशासनाला शोभणारे नाही.

एमपीएससीच्या कारभारात विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी सरकारने पुढील उपायांना प्राधान्य द्यावे. निष्पक्ष चौकशी : परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि अनियमिततांची सखोल चौकशी करून दोषींवर पुराव्यांच्या आधारे कारवाई करावी. भरतीचे निश्चित वेळापत्रक: जाहिरात, परीक्षा, निकाल आणि नियुक्ती यांसाठी वास्तववादी कालमर्यादा निश्चित करून तिचे पालन करावे. पारदर्शक परीक्षा व्यवस्था: प्रश्नपत्रिका सुरक्षितता, परीक्षा केंद्रांवरील नियंत्रण आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करावी. विद्यार्थ्यांशी नियमित संवाद: विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींसोबत ठरावीक कालावधीनंतर बैठका घेऊन निर्णयांची प्रगती सार्वजनिक करावी.

रिक्त पदांबाबत स्पष्टता: विभागनिहाय रिक्त पदे, भरतीचे नियोजन आणि प्रलंबित नियुक्त्यांची माहिती नागरिकांसाठी उपलब्ध करून द्यावी. आंदोलकांवरील कारवाईत संवेदनशीलता: शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन कायदेशीर प्रक्रिया न्याय्य आणि प्रमाणबद्ध ठेवावी. या उपायांची अंमलबजावणी झाली, तर आंदोलनातून निर्माण झालेली अस्वस्थता ही प्रशासकीय सुधारणेची संधी ठरू शकते. अन्यथा आश्वासनांचा पाऊस आणि प्रत्यक्ष कृतीचा दुष्काळ, अशीच सरकारच्या कारभाराची प्रतिमा निर्माण होईल.

सरकारने विद्यार्थ्यांना विरोधक नव्हे, भविष्याचे शिल्पकार मानावे.!

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. विद्यार्थ्यांनी सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित केले म्हणजे ते सरकारचे शत्रू ठरत नाहीत. उलट, प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी व्हावे, अशी त्यांची अपेक्षा असते.आजचे हेच विद्यार्थी उद्या प्रशासकीय अधिकारी बनतील. तेच महसूल व्यवस्था सांभाळतील, कायदा-सुव्यवस्था राखतील, ग्रामीण विकासाच्या योजना राबवतील आणि सामान्य माणसाच्या अडचणी सोडवतील. मग अशा भावी अधिकाऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष का करावे ? विद्यार्थ्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल अविश्वास निर्माण झाला, तर त्याची किंमत केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित राहत नाही. ती संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर परिणाम करते. गुणवत्तेच्या जोरावर संधी मिळेल, या विश्वासावरच स्पर्धा परीक्षांची व्यवस्था उभी असते. तो विश्वास टिकवणे ही आयोगाची आणि सरकारची संयुक्त जबाबदारी आहे. सरकारने हेही लक्षात घ्यावे की, तरुणाईच्या संयमाला अंत नसतो असे समजणे ही मोठी चूक ठरू शकते. तिच्या प्रश्नांना वेळीच न्याय मिळाला, तर तीच तरुणाई राज्याच्या विकासाची ताकद बनते. तिच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष झाले, तर निराशा वाढते आणि व्यवस्थेपासून दुरावा निर्माण होतो.

शेवटी एकच प्रश्न विद्यार्थ्यांचे भविष्य कोणाच्या जबाबदारीवर.?

पुणे आणि मुंबईसह राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने राजकीय चष्म्यातून पाहू नये. आंदोलनाला कोणाचा पाठिंबा आहे, कोणत्या नेत्याने भेट दिली किंवा कोणत्या संघटनेने पुढाकार घेतला, यापेक्षा विद्यार्थ्यांच्या मागण्यांमध्ये तथ्य किती आहे आणि त्यावर न्याय्य तोडगा कसा काढता येईल, हे अधिक महत्त्वाचे आहे. सरकारकडे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत, प्रशासनाकडे अंमलबजावणीची यंत्रणा आहे आणि आयोगाकडे परीक्षा प्रक्रियेची जबाबदारी आहे. मग या सर्व यंत्रणांच्या अस्तित्वानंतरही विद्यार्थ्यांना आपल्या भविष्याच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर प्रत्येक संबंधित यंत्रणेने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांना आश्वासनांची खैरात नको, तर विश्वासाची हमी हवी. त्यांना संघर्षाची शिक्षा नको, तर कष्टांना न्याय देणारी व्यवस्था हवी. त्यांना केवळ पुढील परीक्षेची तारीख नको, तर आपल्या मेहनतीचे भविष्य सुरक्षित असल्याचा विश्वास हवा.

सरकारने आता विद्यार्थ्यांचा आवाज ऐकला पाहिजे. त्यांच्या मागण्यांचा प्रामाणिकपणे विचार केला पाहिजे. चौकशी, सुधारणा आणि भरती प्रक्रियेला कालबद्ध दिशा दिली पाहिजे. कारण प्रश्न केवळ एमपीएससीचा नाही; प्रश्न महाराष्ट्राच्या तरुणाईच्या भविष्याचा आहे.सरकारने विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने वाचावीत, त्यांच्या आक्रोशामागील वेदना समजून घ्याव्यात आणि प्रशासनाचे कान व डोळे उघडे ठेवावेत. कारण तरुणाईच्या भविष्याकडे दुर्लक्ष करून कोणत्याही राज्याला प्रगतीचा दावा करता येत नाही.!

पान १ वरून..

**अखेर विद्यार्थ्यांच्या....**

सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले. आता चौकशीचा अहवाल, दोषींवरील कारवाई आणि भरती प्रक्रियेतील सुधारणा प्रत्यक्षात उतरतात का, हेच निर्णायक ठरणार आहे.

पेपरफुटी प्रकरणात बारावा आरोपी जेरबंद, तपासाला वेग

एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी मयूर चंद्रकांत ठाकरे याला अटक केली. या अटकेमुळे प्रकरणातील अटक झालेल्या आरोपींची संख्या बारावर पोहोचली आहे. न्यायालयाने त्याला १७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी काही उमेदवारांपर्यंत पोहोचल्याच्या आरोपांची तपास यंत्रणा चौकशी करत आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांवर सरकारची भूमिका

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी आयोगाच्या कामकाजात पारदर्शकता, कथित पेपरफुटीची निष्पक्ष चौकशी, अध्यक्षांवर कारवाई आणि भरती प्रक्रियेत सुधारणा करण्याची मागणी केली होती. सरकारने जाहीर केलेल्या निर्णयांमध्ये,

माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन., तुकाराम मुंडे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती., चौकशी पूर्ण होईपर्यंत अध्यक्ष विवेक भीमनवार यांना पदापासून दूर ठेवण्याचा निर्णय., आंदोलक विद्यार्थ्यांवरील दाखल गुन्हे मागे घेण्याबाबत आश्वासन., आगामी भरती आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत सकारात्मक निर्णय.

सरकारने जाहीर केलेल्या या उपाययोजनांनंतर आंदोलन स्थगित करण्यात आले असले, तरी मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि चौकशीचा निष्कर्ष याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष राहणार आहे.

आता खरी कसोटी पारदर्शकतेची..!

एमपीएससी ही लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीच्या आणि भविष्याच्या आशेची संस्था आहे. त्यामुळे कथित पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कायदेशीर कारवाई होणे, चौकशी निष्पक्षपणे पूर्ण होणे आणि भविष्यात परीक्षांच्या गोपनीयतेला धक्का लागणार नाही, अशी विश्वासार्ह व्यवस्था उभी राहणे अत्यावश्यक आहे.

**गंजीस आग लागून ..**

कापणीसाठी मागत शेतकऱ्यांना वेठीस धरत आहे.

अशा परिस्थितीत मुक्रमाबाद पासून जवळच परतपूर शिवारातील शेतकरी मारुती नरशीग देवकते यांनी आपल्या गट नंबर १५ या १४ एकर क्षेत्र शेतातील दहा बॅग सोयाबीनची कापणी करून विद्युत पुरवठा करणाऱ्या मेन लाईन खाली सोयाबीनचा ढीग लावला होता.पण अचानक शुक्रवारी मध्यरात्री मेन लाईनवर शॉर्टसर्किट होऊन या ठिणग्या सोयाच्या ढिगावर पडून पूर्ण जळून खाक झाले आहे.यामुळे ऐन दसरा दिवाळीच्या तोंडावर या शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाल्याने यांचे संसार उघड्यावर पडले आहे.

ही घटना कळतात पोलीस स्टेशन मुक्रमाबादचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेऊन पीडित शेतकऱ्यांना धीर देत जळून खाक झालेल्या सोयाबीनचा पंचनामा केला तसेच रावी सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी आर.एच. गायकवाड यांनी तहसील कार्यालयात लेखी स्वरूपात माहिती देऊन पुढील प्रक्रियेत जळून खाक झालेल्या सोयाबीनचा पंचनामा करून याबाबतचा नुकसानीचा अहवाल तहसीलदार मुखेड यांच्याकडे सादर करून तात्काळ या पिढीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची बोलतांना दिली.

**माध्यम स्वातंत्र्यावरील....**

देश वाचवा' आणि 'हुकूमशाही सरकार मुर्दाबाद' अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, भारताचे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदन सादर करण्यात आले.

नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे दि. १० ऑक्टोबर २०२६ पासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी संघटनेकडून आंदोलन सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी देशाच्या विविध भागांतून दिल्लीकडे येणाऱ्या आंदोलनकर्त्यांना रेल्वे आणि रस्त्यांवर अडवून ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला.तसेच रेल्वे सेवा आणि मेट्रो स्थानके बंद करणे, दिल्लीतील इंटरनेट सेवा खंडित करणे आणि आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून मारहाण व दडपशाही करणे, अशा घटनांमुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकारावर गदा येत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

पत्रकारांशी गैरवर्तन केल्याचा निषेध

आंदोलनाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनाही गैरवर्तनाला सामोरे जावे लागल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. अधिकृत प्रेस कार्ड दाखवूनही पत्रकारांना बळजबरीने ताब्यात घेऊन वाहनात बसवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. पत्रकारांना निर्भयपणे वार्तांकन करता यावे, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण

पान १ वरून..

व्हावे आणि पत्रकारांशी सन्मानपूर्वक वागणूक दिली जावी, अशी मागणी निदर्शकांनी केली.

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, रामनाथ खोड, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद, इंटकचे बीड जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके , सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे , प्राचार्य काम्रेड डी.जी.तांदळे (जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा बीड), नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), प्रविण आनेराव ( जिल्हाध्यक्ष मायक्रो ओबीसी महासंघ बीड), सामाजिक कार्यकर्ते सरफराज पठाण, गणेश वटारे, माऊली शिंदे,

यांच्यासह विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**बीडमध्ये १६ ऑक्टोबर....**

अविनाश जोगदंड, चर्मकार महासंघाचे ज्ञानोबा माने,विष्णू जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेमध्ये अधिक माहिती सांगताना युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे म्हणाले की, पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हेरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरूप घेत आहे.

मराठवाड्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांची पिके हातची गेली असून, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील कष्टकरी कुटुंबांसमोरही आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त शेतकऱ्याना हेक्टरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत, शेतमजूर, कामगार, मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबीयांसह भूमिहीन कुटुंबांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा आर्थिक आधार द्यावा, शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना दरमहा ५ हजार रुपये शिष्यवृत्ती वाढती महागाई लक्षात घेऊन तात्काळ करण्यात यावी अनुसूचित जाती मधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया सरकारने तात्काळ रद्द करावी तसेच अनुसूचित जाती-जमातींसह वंचित घटकांच्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी भूमिका रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मांडण्यात येणार आहे.

बीड शहरात विराट निळ्या वादळात शक्तिप्रदर्शनाची तयारी..

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या जाहीर सभेसाठी बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, केज, अंबाजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर, वडवणी आणि धारूर आदी तालुक्यांत गावोगावी बैठका घेऊन कार्यकर्ते व नागरिकांना सभेसाठी आमंत्रित करण्यात येत आहे. बीड शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी नियोजन बैठका घेऊन सभेच्या यशस्वितेसाठी तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले.

दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी रिपाईने महाराष्ट्रात पाठवल्या १०० ट्रक जीवनावश्यक वस्तूंची मदत...!

रिपाईच्या वतीने केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना सणासुदीच्या काळात मदत करण्यासाठी शंभर ट्रक धान्य व जेवणावश्यक वस्तूंची मदत देण्याची घोषणा केली आहे. या मदतीच्या उपक्रमाचा भाग म्हणून बीड जिल्ह्यासाठी १८० किराणा सामानाच्या किट आलेल्या आहेत.यापैकी २५० किटचे पाटोदा, शिरूर कासार तालुक्यामध्ये वाटप झाले आहे. मदत एका जातीपूर्ती मर्यादित न ठेवता सर्व जाती धर्मातील गोरगरीब, गरजूवंतांपर्यंत ही मदत पोहचविण्यात येणार असून पुढील काळातही मदतकार्य सुरू ठेवण्याचा प्रयत्न राहील असेही पप्पू कागदे यांनी स्पष्ट केले.

**मजुरी करून मुलाला....**

स्वागतामुळे शेख अलीमच्या यशाला विशेष आनंदाची जोड मिळाली. यावेळी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष शेख आयेशा यांची विशेष उपस्थिती होती.

आईच्या कष्टांचे चीज, कुटुंबाच्या स्वप्नांची पूर्तता.!

एखाद्या यशस्वी व्यक्तीच्या पाठीमागे अनेकदा कुटुंबाचा मोठा संघर्ष दडलेला असतो. शेख अलीमच्या यशामागेही त्याच्या आई-वडिलांचे कष्ट, त्याग आणि मुलाच्या भविष्याविषयीची आशा आहे. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी शिक्षण, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर यश मिळवता येते, हा संदेश त्याच्या यशातून मिळतो.

शेख अलीमच्या निवडीबद्दल मित्र माळी गवळीराम आत्माराम यांच्यासह मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून त्याचे तसेच त्याच्या आई-वडिलांचे अभिनंदन केले जात आहे. एका सामान्य कुटुंबातील युवकाने मिळवलेले हे यश इतर तरुणांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. आईच्या हातांवरील कष्टांच्या रेषांना मुलाच्या यशाने मिळालेला हा आनंद म्हणजे खऱ्या अर्थाने संघर्षाचे सार्थक ठरले आहे.

# मायेची सावली, वात्सल्याचा आधार काळाच्या पडद्याआड गेला!

## नरसी येथील ज्येष्ठ महिला पार्वतीबाई वाघमारे यांचे दुःखद निधन

नायगाव ।प्रतिनिधी

नरसी येथील ज्येष्ठ महिला पार्वतीबाई माधवराव वाघमारे (वय ८३) यांनी गुरुवारी रात्री अल्पशा आजाराने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने वाघमारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार दिलीप वाघमारे यांच्यावर मातृवियोगाची दुःखद वेळ आली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून लातूर येथील रुग्णालयात मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्यांनी नरसी येथील आपल्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. शुक्रवारी सकाळी नरसी येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

नरसी येथे शनिवारी त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी खा. रवींद्र चव्हाण यांचे प्रतिनिधी केशवराव पा. चव्हाण,राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भास्कर भिलवंडे, श्रीनिवास पा. चव्हाण,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर,माजी जि. प.सदस्य माणिकराव लोहगावे,शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश कदम,संभाजी भिलवंडे, भाजपा नेते श्रावण पा. भिलवंडे,शिवसेना तालुका प्रमुख रविंद्र भिलवंडे, राजू गंदीगुडे,दत्तात्रय होटाळकर,प्राचार्य फजगे,रमेश शिवणीकर,माजी सरपंच गजानन भिववंडे,चंद्रशेखर भिलवंडे पत्रकारशेख वहबोद्दिन, गंगाधर भिलवंडे,प्रभाकर लखपत्रेवार,रघुनाथ सोनकांबळे, गंगाधर गंगासागरे, सय्यद जाफर, गोविंद नरसीकर, प्रकाश हानमंते, शेख आरीफभाई, माधव धडेकर, बालाजी हानमंते, प्रकाश कामळजकर, तानाजी शेळगावकर, गणेश कंदुर्के, निळकंठ जाधव, राजेंद्र कांबळे बिलोली, संदीप गायकवाड,श्याम चौंडे,माधवराव कोरे,पांडुरंग बागडे,मठपती महाराज,सुनील भेदे,रमाकांत सुर्यवंशी,यासह नातेवाईक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी उपस्थित होती.

अस्थिकलश राहेर येथे विसर्जन

नरसी येथील दिवंगत पार्वतीबाई माधवराव वाघमारे यांच्या अस्थिकलशाचे रविवारी राहेर येथील गोदावरी नदीच्या पात्रात विधिवत विसर्जन करण्यात आले. यावेळी वाघमारे कुटुंबीय उपस्थित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबाने मायेचा आधार गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.यावेळी गोंविद हनवटे, गंगाधर वाघमारे,श्याम गायकवाड, अनिल पवळेसह वाघमारे कुंटुंबिया उपस्थित होते

वाघमारे कुंटुंबियाचे सांत्वन भेट

नरसी येथे पार्वतीबाई वाघमारे ह्या शनिवारी अनंतात विलीन झाल्यानंतर त्यांच्या निवासस्थानी भाजपाचे नेते राजेश देशमुख कुंटूरकर,बालाजी बच्चेवार, वसंत सुगावे,उधोगपती



दिपक कांबळे रामपूरकर,सूर्याजी पाटील चाडकर,गोंविद हनवटे, रामतीर्थचे सपोनी विक्रम हराळे,प्रशांत पवार,सचिन भंडारे, यांनी वाघमारे कुंटुंबियांचे भेट घेत सांत्वन केले.वाघमारे कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला 'चलो नागपूर!'

## पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे भीम सैनिकांचे ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन; अनिल तुरुकमारे यांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पूर्वसंध्येला पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने भीम सैनिकांचे ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन व देशव्यापी मेळावा सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता नागपूर येथील आयटीआय मैदान, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे. या अधिवेशनासाठी मराठवाड्यातील हजारो भीम सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा सरचिटणीस अनिल तुरुकमारे यांनी केले आहे.

या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, लाँग मार्चचे प्रणेते तथा माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे सर राहणार आहेत. तसेच भारत सरकारचे केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.अधिवेशनाला राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये पी.आर.पी.चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीपभाई कवाडे, महाराष्ट्र प्रदेश प्रभारी गोपाळराव आटोटे, ॲड. जे. के. नारायणे, प्रदेशाध्यक्ष गणेशभाई उन्हवणे, चरणदासजी इंगोले यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश आहे.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या राष्ट्रीय अधिवेशनाला सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक बळकट करण्यासाठी आणि आंबेडकरी विचारांचा जागर करण्यासाठी विशेष महत्त्व आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील भीम सैनिक, कार्यकर्ते आणि आंबेडकरी विचारांच्या अनुयायांनी मोठ्या संख्येने नागपूर येथे उपस्थित राहावे,



असे आवाहन अनिल तुरुकमारे यांनी केले आहे.'चलो नागपूर!' या घोषणेसह राष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होण्यासाठी भीम सैनिकांनी सज्ज व्हावे, असे आवाहन पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात बार कौन्सिल सदस्या ॲड. माधवी पोतदार यांचा सत्कार




बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या सदस्या मा. ड. माधवीताई पोतदार यांनी स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयास भेट दिली. महाराष्ट्र आणि गोवा सदस्य पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मा .अँड . माधवीताई पोतदार यांचे स्वागत व सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान व सर्व शिक्षकांच्या वतीने काण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना ड. माधवीताई पोतदार म्हणाल्या, विधी महाविद्यालयाचे तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थांचे प्रश्न व अडचणी सोडवण्यासाठी मी बार काऊंसील तर्फे सर्वतोपरी प्रयत्न करील आणि वकील बांधवांच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करेल असे आस्वासन दिले . त्यांच्या या आश्वासनामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.हा कार्यक्रम महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. आमदार राजेंद्र जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा वरिष्ठ विधिज्ञ ड. के. एस. पंडित, ज्येष्ठ प्रा. एन. एन. साबळे, प्रा. सुनील हराळे, प्रा. कपिल कुमार बेंद्रे, प्रा. शेख फारूक, प्रा. पंकज तांदळे, प्रा. पार्थ कुलकर्णी, प्रा. अक्षय महामुनी, प्रा . गोपाल सर्वज्ञ ,प्रा. एस. एस. शिंदे, प्रा. महेश कानपाठक, प्रा. फिडेल चव्हाण उपस्थित होते.तसेच महिला प्राध्यापिका डॉ. गौरी नाईक, प्रा. विशाखा जाधव, प्रा. नबीला खातून, प्रा. रविना सवई, प्रा. मंगल जोगदंड यांच्यासह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**बीड : नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकरांना सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी प्राचार्य डी.जी. तांदळे, राजकुमार कदम, नितीन जायभाये,डॉ. संजय तांदळे , प्रा. बाळासाहेब नागरगोजे,बाजीराव ढाकणे डॉ. लक्ष्मण पवळ, दिलीप चिंचोलकर, आदींची उपस्थिती होती.**

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४२९/२०२६**
**शरद वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मालेगांव बु.**
**(मार्फत – ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **शरद बबन बोरकर, वय–३२ वर्षे, रा.मालेगांव बु. ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **मालेगांव बु.ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची मुलगी शिवाणी शरद बोरकर रा.मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड हिच्या दिनांक २४/०३/२०२० रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २८/१०/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८५३/२०२६**
**गंगाबाई भ्र. भगवान लाखे व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. आर.एल. गवारे)**

ज्याअर्थी मयत नामे भगवान पि. आश्रुबा लाखे, रा. एरंडगाव ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक २२/१२/२०२३ रोजी एरंडगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ गंगाबाई भ्र. भगवान लाखे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. एरंडगाव ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ रमेश पि. भगवान लाखे, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, अर्जदार क्र. ३ संजय पि. भगवान लाखे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. सदर यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भगवान पि. आश्रुबा लाखे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – २७/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहीर प्रगटन**
**मा. श्री पी.एस. घोडके, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १४०२/२०२६**
**विजया विरूध्द निरंक**
**अर्जदार**
**१) विजया भ्र. इंदर कदम वय– ४९ वर्ष धंदा–घरकाम रा.अंजनवती ता. जि. बीड**
**२) सतीश पि. इंदर कदम वय – ३५ वर्ष धंदा– शेती रा.अंजनवती ता. जि. बीड**
**३) किशोर पि. इंदर कदम वय – २९ वर्ष धंदा– शेती रा. अंजनवती ता. जि. बीड**
**४) सीमा भ्रं. अमोल सुपेकर वय – ३३ वर्ष धंदा– घरकाम रा. नायगाव ता. पाटोदा जि. बीड**
**वि. निरंक**
**मागणी–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात इंदर निवृत्ती कदम रा. अंजनवती, बीड, ता.जि. बीड यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत इंदर निवृत्ती कदम यांचा मृत्यु दिनांक २६.०४.२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदार १ ते ४ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत इंदर निवृत्ती कदम यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार १ ते ४ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार १ ते ४ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत इंदर निवृत्ती कदम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९.१०.२०२६ आहे.

**कनिष्ठ लिपीक**

**आदेशावरून**
**अधीक्षक**

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४२७/२०२६**
**श्रेया वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पौळाचीवाडी**
**(मार्फत – ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **श्रेया दत्तात्रय मैंद, वय–१८ वर्षे, रा.पौळाचीवाडी ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **पौळाचीवाडी ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची स्वतःची दिनांक ०४/०१/२००८ रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २८/१०/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ६१०/२०२६**
**निसार इस्माईल शेख वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चकलांबा**
**(ॲड. ए. एस. नाकाडे यांच्यामार्फत)**

ज्याअर्थी अर्जदार नामे निसार इस्माईल शेख, वय ३३ वर्ष रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चकलांबा ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराच्या दिनांक ०४/०६/ १९९३ रोजची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १९/११/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**नोटीस**
**मा. श्री. कृष्णराव के. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात ॲड.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३४४/२०२६**
**अरुणाबाई अर्जदार**
**विरुध्द**
**१) अरूणाबाई रमेश शिंदे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. घारगाव ता.जि.बीड**
**२) अमोल रमेश शिदे, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. घारगाव ता. जि.बीड.**
**३) बालुबाई निलेश नाईकवाडे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम रा. घारगाव ता.जि.बीड**
**गैर–अर्जदार**
**निरंक कोणीही नाही अर्जदार हे भारतीय आहेत.**
**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे, प्रेमराज किशोर जमदाडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे रमेश सोपान शिदि हे १६/११/२०१९ रोजी पाली येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार न. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार न. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २२/१०/२०२६

आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**वरिष्ठ लिपीक**

**आदेशावरून**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

---

**जाहीर प्रगटनाद्वारे समन्स**
**कळंब येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**सीएनआर–एमएचओएस १७–०००८१०–२०२५**
**विशेष दिवाणी दावा क्र. १९/२०२५**
**तबसुम जहागीरदार (शेख) वि. कौशल्या पवार**
**निशाणी क्रमांक**
**प्रतिवादी क्र. १. कौशल्या मुरलीधर पवार (मयत) वारस**
**१/ब. सुनंदा विश्वनाथ काळे**
**रा. विठाई पुरमजवळ, कळंब रोड केज, ता. केज. जि. बीड.**
**......–यांस**

ज्याअर्थी उपरिनामित वादी तबसुम शफियोद्दीन जहागीरदार (शेख) रा. शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी ह्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ०२/११/२०२६ रोजी दिवसा ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास यो–ह ग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तरे देउ शकेल अश्या वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नाचे देउ शकणारे एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याव्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेंट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर केम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेंट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर केम) पुष्टर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरीता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसुर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,कळंब

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४१७/२०२६**
**ज्ञानेश्वर वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मालेगांव बु.**
**(मार्फत – ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुरज सुभाष गोरे वय–३४ वर्षे, रा.मालेगांव बु. ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची स्वतःची दिनांक १०/०५/१९९२ रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २१/१०/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३१/२०२६**
**ज्ञानेश्वर वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पौळाचीवाडी**
**(मार्फत – ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **ज्ञानेश्वर महादेव जाधव, वय–२३ वर्षे, रा.पौळाचीवाडी ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **पौळाचीवाडी ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची स्वतःची दिनांक १७/०५/२००२ रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २८/१०/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८४३/२०२६**
**नामदेव आसाराम जवंजाळ इतर वि. वृंदावनी विष्णु दिलवाले**
**(मार्फत ॲड. के. व्ही. वावरे)**

ज्याअर्थी मयत नामे आसाराम बाबुराव जवंजाळ, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १०/०४/२०२३ रोजी गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ नामदेव आसाराम जवंजाळ, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड अर्जदार क्र. २ ज्ञानेश्वर आसाराम जवंजाळ, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड, गैरअर्जदार क्र. १ वृंदावनी भ्र. विष्णु दिलवाले, वय ७२ वर्षे, धंदा शेती, रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड गैरअर्जदार क्र. २ अनुसया भ्र. बळीराम चौधरी, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. पाडळसिंगी ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. ३ अंजना भ्र. प्रकाश माळवले, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. लक्ष्मणनगर, लेंडी रोड, बीड ता.जि. बीड, गैरअर्जदार क्र. ४ सावित्रा भ्र. रामनाथ लंगुटे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. सेक्टर ३ कळंबुली ता. पनवेल जि. रायगड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत आसाराम बाबुराव जवंजाळ यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख २६/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३९/२०२६**
**अशोक गंगाधर घुमरे वि. निरंक**
**(मार्फत ॲड. के. व्ही. वावरे)**

ज्याअर्थी मयत नामे रुक्मीणी गंगाधर घुमरे, रा. गेवराई ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ३०/०८/२०२६ रोजी गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार अशोक पि. गंगाधर घुमरे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. रंगार चौक, गैबी साहेब गल्ली, गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रुक्मीणी गंगाधर घुमरे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – २६/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**जाहिर घोषणा**
**मा. श्री. रविंद्र अ.मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४२५/२०२६**
**सुरज वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मालेगांव बु.**
**(मार्फत – ॲड. आर.एल.गवारे)**

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुरज सुभाष गोरे वय–३४ वर्षे, रा.मालेगांव बु. ता.गेवराई** यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, **मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे **अर्जदाराची मुलगी नामे कालींदा सुरज गोरे रा.मालेगांव दिनांक १५/०८/२०१८ रोजची जन्म** नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २१/१०/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---

**जाहिर प्रगटण**
**मा. श्री. रविंद्र अ. मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ अर्ज क ४५७/२०२६**
**शेख मेराज रसूल विरुद्ध माननीय मुख्य अधिकारी, नगरपालिका कार्यालय, गेवराई**
**(ॲड. आर. एल. गवारे यांच्यामार्फत)**

ज्याअर्थी अर्जदार नामे शेख मेहराज रसुल (वडीलांकडील नाव) मेहराज इलियास शेख ( पतीकडील नाव) वय ३५ वर्षे रा. संजय नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी गैरअर्जदार मुख्याधिकारी साहेब, नगर परिषद कार्यालय गेवराई ता. गेवराई, जि.बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराने त्यांच्या जन्माची दिनांक १२/०४/१९९१ रोजीची नोंद घेणे बाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास अथवा ईतर कोणासही काही आक्षेप असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तिस दिवसांचे आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने अथवा अन्य कोणीही योग्य हरकती न दाखविल्यास सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच अर्जदाराचा पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल

पुढील तारीख आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारिख – २७/१०/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

---


**जाहिर घोषणा**
**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ६१०/२०२६**
**निसार इस्माईल शेख वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चकलांबा**
**(ॲड. ए. एस. नाकाडे यांच्यामार्फत)**

ज्याअर्थी अर्जदार नामे निसार इस्माईल शेख, वय ३३ वर्ष रा. चकलांबा ता. गेवराई जि. बीड यांनी गैरअर्जदार ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चकलांबा ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराच्या दिनांक ०४/०६/ १९९३ रोजची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १९/११/ २०२६.

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय, गेवराई

# जे.के.दादा जोंधळे यांना मानाचा धम्मरत्न समाज गौरव पुरस्कार जाहीर

धर्माबाद / अशोक पडोळे

शहर, तालुका व तेलंगाना महाराष्ट्र सीमावृत्तीय भागात आंबेडकरी चळवळीचे मानबिंदू समजल्या जाणारे जे.के. दादा जोंधळे यांना मानाचा असा धम्मरत्न समाज गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

मा जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड,( संचलित संवेदना सेवाभावी संस्था नांदेड) आणि आर्केस्ट्रा आर्टिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत आदराने जे.के. दादा जोंधळे यांच्या कार्याची दखल घेत यावर्षीचा धम्मरत्न समाज गौरव हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना जाहीर झाला असून ७०व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी या अजरामर बुद्ध भीम गीताचा कार्यक्रम आयोजक विकास जोंधळे यांनी कुसुम सभागृहात आयोजित केला असून याच ठिकाणी याच कार्यक्रमात जे के दादा जोंधळे यांना हा मानाचा पुरस्कार वितरित केला जाणार आहे.



इंदिरानगर येथील जे.के. दादा जोंधळे यांच्या निवासस्थानी आयोजक विकास जोंधळे यांनी जातीने उपस्थित राहून त्यांना पुरस्कार निवड पत्र दिले. यावेळी समाजातील अनेक मान्यवर व प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे यांनी हा पुरस्कार अगदी योग्य व्यक्तिमत्त्वाला गेल्यामुळे या पुरस्काराला न्याय भेटला अशा प्रतिक्रिया दिल्या.

# ऊसतोड कामगाराच्या कुटुंबाला संकटाच्या काळात आ.सुरेश धस यांनी दिला आधार

पाटोदा ।प्रतिनिधी

संकटाच्या काळात माणुसकीचे दर्शन घडवत, पाटोदा तालुक्यातील मन्यारवाडी येथील दुर्दैवी अपघातात सापडलेल्या ऊसतोड कामगार कुटुंबाला आमदार सुरेश धस यांनी मोठा आधार दिला आहे. उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून तब्बल १ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करून घेत या कुटुंबाला दिलासा दिला आहे.मन्यारवाडी येथील ऊसतोड कामगार श्री. बंडू वाणी यांचा मुलगा ज्योतीराम वाणी यांचा नुकताच एक दुर्दैवी अपघात झाला होता. या भीषण अपघातानंतर वाणी कुटुंबावर आर्थिक संकट ओढावले होते. हातावर पोट असणाऱ्या या कुटुंबासमोर मुलाच्या उपचाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता.अशा अत्यंत कठीण परिस्थितीत आमदार सुरेश धस यांनी या कुटुंबाची वेदना समजून घेत तातडीने मदतीचा हात पुढे केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून सुरुवातीला ७० हजार रुपये आणि विशेष बाब म्हणून पुन्हा ३० हजार रुपये, अशी एकूण १ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. ही मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या आरोग्य टीमने सतत पाठपुरावा केला.

संकटाच्या या काळात शासनाकडून आणि आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून मिळालेल्या मदतीमुळे वाणी कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे. याबद्दल ज्योतीराम यांचे वडील बंडू वाणी यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे आ. सुरेश धस आणि त्यांच्या आरोग्य टीमचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणीमुळे कोणाचेही उपचार थांबू नयेत, यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध व प्रयत्नशील आहोत, अशी प्रतिक्रिया या प्रसंगी व्यक्त करण्यात आली आहे. आमदार धस यांच्या या जनसेवेबद्दल आणि संवेदनशील भूमिकेबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



# कारखानदाराचा लालचीपणा शेतकऱ्यांच्या मुळावर - राजेंद्र आमटे

## साखरेचे भाव वाढले मग उसाचे भाव का वाढत नाहीत ? – शेतकरी हक्क मोर्चा

बीड ।प्रतिनिधी

दुष्काळामुळे शेतकऱ्याचे सोयाबीन गेले आहे कापूस गेला आहे उसाचा शेतकरी तरी वाचला पाहिजे. देशात साखरेचे भाव वाढत आहे तीस-पस्तीस रुपयांनी मिळणारी साखर ६० ते ७० रुपये पेक्षा जास्त भावाने विकली जात आहे. साखरेचे भाव वाढत असताना शेतात रात्रंदिवस कष्ट करून ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला कारखाना वाढीव भाव का देत नाही. कारखानदारांनी किती खावं याचा कुठेतरी लिमिट ठेवावं तुमचा लालचीपणामुळे शेतकऱ्याचा अतोनात नुकसान होत आहे कारखानदाराचा लालचीपणा शेतकऱ्याच्या मुळावर असे शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी मांडले शेतकऱ्याच्या कष्टाची जाणीव ठेवून कारखानदारांनी शेतकऱ्याच्या कष्टाचे योग्य मोल शेतकऱ्यांना देण्यात यावे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल पहिला हप्ता




४२००रुपये देण्यात यावा व अंतिम हप्ता पाच हजार रुपये देण्यात यावा या मागणी करिता शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.या निवेदनामध्ये शेतकऱ्यांना प्रति टन पहिला हप्ता ४२००रुपये व अंतिम हप्ता ५००० रुपये देण्यात यावा देशामध्ये पंजाब मध्ये शेतकऱ्यांना भाव जास्त मिळतो तामिळनाडू सरकार शेतकऱ्यांना जास्त भाव देते पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना जास्त भाव मिळतो मंग मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उसाला भाव जास्त का मिळत नाही कागदावरचे घोडे नाचवण्यापेक्षा कारखानदाराने लालचीपणा सोडावा व शेतकऱ्याला ऊसाला चांगला भाव द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देऊन करण्यात आले यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे ,डॉ. गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे, अशोकराव येडे, हनुमानराव घोडके, रामधन जमाले, कॉम्रेड डी.जी. तांदळे,सय्यद सादेक, गणेश वटारे, अशोक सुरवसे ,बाजीराव ढाकणे, युनूस शेख, डॉ. संजय तांदळे, शेख मोबीन, आदी शेतकरी उपस्थित होते.




# अधिकारी–कर्मचाऱ्यांना माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचे ज्ञान आवश्यक – उपसचिव राजाराम सरवदे

## माहिती अधिकार सप्ताहाचा समारोप,भूमी अभिलेख विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी आणि नियमांची योग्य माहिती असल्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करून देताना अडचणी येत नाहीत. त्यामुळे प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याला माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचे ज्ञान असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे उपसचिव राजाराम सरवदे यांनी केले.

राज्य माहिती आयोगाचे छत्रपती संभाजीनगर खंडपीठ आणि भूमी अभिलेख विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते १२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या सप्ताहाचा समारोप आज भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी येथे झाला. यावेळी श्री. सरवदे बोलत होते.यावेळी भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक संग्राम जोगदंड, उपअधीक्षक निलेश उंडे, भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीच्या उपप्राचार्य स्वाती लोंडे, राज्य माहिती आयोगाचे नायब तहसीलदार आर. आर. जोहरी, कक्ष अधिकारी एम. एम. परदेशी, एस. बी. डाखोळे, सहायक कक्ष अधिकारी व्ही.डी. शिंदे, कास्ट्राईब संघटनेचे सरचिटणीस आर.एम. कांबळे आदी उपस्थित होते. तसेच भूमी अभिलेख विभागातील जन माहिती अधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यशाळेत सहभागी झाले होते.प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणी या उद्देशाने माहिती अधिकार सप्ताहादरम्यान जनजागृतीपर विविध उपक्रम राबविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक निदेशक शिवराज जाधव यांनी केले. त्यांनी माहिती अधिकार सप्ताहाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. तसेच, सप्ताहादरम्यान राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. शेवटी निदेशक शैलेंद्र गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# अल्पसंख्याक विभागाच्या सचिव डॉ. माधवी खोडे चवरे यांची हज हाऊसला भेट

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिव डॉ. माधवी खोडे चवरे यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने किल्ले अर्क, व्ही.आय.पी. रोड येथील हज हाऊसला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली.

हज यात्रेकरूंच्या सुविधा, प्रशासकीय व्यवस्था आणि आगामी नियोजनाचा आढावा घेणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.या दौऱ्यादरम्यान अल्पसंख्याक विकास विभाग व हज कमिटीच्या प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी अल्पसंख्याक आयुक्तालयाच्या आयुक्त प्रतीभा इंगळे, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी फयाझ खान , उपायुक्त ख्वाजा अश्रफ, प्रतिभा चौधरी, जुनेद सय्यद, कक्ष अधिकारी खदिजा नाईकवाडे, लेखा अधिकारी शोएब मुसा शेख,रशीद शेख उपस्थित होते. त्यांनी यावेळी हज हाऊसमधील पायाभूत सुविधा, निवास व्यवस्था आणि प्रशासकीय कामांची सविस्तर पाहणी केली. यात्रेकरूंना उत्तम सेवा मिळावी यासाठी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना डॉ. माधवी खोडे चवरे यांनी केल्या.

# उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे - जी. श्रीकांत

## औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातील उमेदवारांची बैठक

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सर्व उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी उमेदवारांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, देविदास टेकाळे व उमेदवार उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना यावेळी देण्यात आल्या. निवडणूक प्रक्रियेबाबत काही तक्रारी किंवा सूचना असल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात, असेही श्रीकांत यांनी सांगितले.या मतदारसंघात एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार असून, मतदानासाठी ८४२ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुमारे ३५० अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. उमेदवार व त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत ओळखपत्रे सादर करावीत. ओळखपत्राशिवाय मतदान केंद्रात प्रवेश मिळणार नाही. मतदान केंद्रात भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास




मनाई आहे. मतदान प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नसून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.मतदानाच्या ४८ तास आधी सर्व प्रकारचा निवडणूक प्रचार बंद करणे बंधनकारक आहे. या कालावधीत सभा, ऑनलाइन माध्यमांद्वारे प्रचार व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रचारात्मक कृती करता येणार नाहीत. प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा स्थानिक प्रशासनाची परवानगी घ्यावी. छापील प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद करावा. जात, धर्म, भाषा किंवा लिंगाच्या आधारावर मतदारांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या प्रचारास मनाई आहे. तसेच, मतदारांना प्रलोभने देणे, धार्मिक स्थळांवर प्रचार करणे, मतदानाची गोपनीयता भंग करणे व मतदान केंद्राजवळ प्रचार करणे प्रतिबंधित आहे. बोगस मतदानाची बाब निदर्शनास आल्यास तातडीने निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले.उमेदवारांच्या मदतीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये तसेच मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात वेगवेगळे कक्ष उभारण्यात आले आहे. या ठिकाणावरून उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेतील सर्व आवश्यक सोयी सुविधा व मार्गदर्शन मिळेल.

प्रसार माध्यमांसंदर्भातील जाहिरातींचा मजकूर तपासणे आवश्यक आहे. यासाठी माध्यम सनियंत्रण व प्रमाणन केंद्र कक्षातून परवानगी घेणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा उप निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यरत असून या आठही जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून आवश्यक त्या परवानगी घेण्यात याव्या असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.मतमोजणी प्रक्रियेची माहिती देण्यासाठी १५ ऑक्टोबर रोजी वंदे मातरम् सभागृहात प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. मतमोजणीच्या तीन ते चार दिवस आधी प्रतिनिधींची यादी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावी. मतमोजणीसाठी ७० टेबल व टपाली मतपत्रिकांसाठी एक टेबल, असे एकूण ७१ टेबल असतील. प्रत्येक उमेदवाराला प्रत्येक टेबलासाठी एक याप्रमाणे ७१ प्रतिनिधी नेमता येतील. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या विहित नमुन्यात अर्ज भरून ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. मतमोजणीत आवश्यक मतसंख्या कोणत्याही उमेदवाराला न मिळाल्यास सर्वांत कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून त्याच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीक्रमानुसार मतांचे हस्तांतरण केले जाईल. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे व मंजुषा मिसकर यांनी निवडणूक प्रक्रिया, आचारसंहितेचे पालन, मतदान प्रतिनिधींची नियुक्ती, प्रचार साहित्याच्या मुद्रणाचे नियम व मतदानाच्या दिवशी

# ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

## महाराष्ट्राच्या लोककलेतील दिमाखदार पर्वाची अखेर – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई ।प्रतिनिधी

मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात आपल्या समर्थ अभिनयाने आणि बहारदार लावणीने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या लोककलेतील एक दिमाखदार पर्व संपले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, मधू कांबीकर यांनी महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेचा अस्सल बाज आयुष्यभर जपला. लोककलेच्या व्यासपीठावर सुरू झालेला त्यांचा प्रवास मराठी नाटक आणि चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचला. आपल्या सहजसुंदर अभिनयाने, वैशिष्ट्यपूर्ण नृत्यशैलीने आणि लावणीच्या प्रभावी सादरीकरणाने त्यांनी रसिकांच्या मनावर अनेक दशके अधिराज्य गाजवले.बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव येथे जन्मलेल्या मधू कांबीकर यांना बालपणापासूनच लोककलेचा समृद्ध वारसा लाभला. अत्यंत लहान वयात रंगमंचावर पाऊल ठेवत त्यांनी आपल्या कलेच्या बळावर स्वतंत्र स्थान निर्माण केले. लावणी आणि तमाशासारख्या महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांना व्यापक प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी ७५ हून अधिक चित्रपटांसह अनेक नाटकांमधून आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयाची छाप उमटवली.ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेच्या व्यासपीठापासून चित्रपटसृष्टीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा जिद्द, संघर्ष आणि कलेवरील निष्ठेचा प्रेरणादायी प्रवास होता. आपल्या कलेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि लावणीची परंपरा समृद्ध केली. त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान आणि त्यांनी साकारलेल्या भूमिका रसिकांच्या स्मरणात कायम राहतील.मधू कांबीकर यांच्या निधनाने मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रातील एक ज्येष्ठ, प्रतिभावंत आणि अस्सल कलावंत हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. मधू कांबीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली, अशी भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आ.सुरेश धस यांची नानाची वाडी येथे सांत्वन भेट

## नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून पाटेकर कुटुंबीयांचे केले सांत्वन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीसह सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. या दुःखद प्रसंगी आमदार सुरेश आण्णा धस यांनी पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील नानाची वाडी या निवासस्थानी भेट देऊन नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांचे पुत्र मल्हार पाटेकर यांची भेट घेऊन पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

नाना पाटेकर यांनी आपल्या दमदार अभिनयाने, परखड विचारांनी आणि सामाजिक कार्यातून रसिकांच्या मनात



अढळ स्थान निर्माण केले होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत विविधांगी भूमिका साकारत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

अभिनयासोबतच सामाजिक बांधिलकी जपत केलेले त्यांचे कार्यही उल्लेखनीय होते. नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वाची मोठी हानी झाली असून, त्यांच्या कलात्मक आणि सामाजिक योगदानाच्या आठवणी कायम स्मरणात राहतील. यावेळी आ. सुरेश धस यांनी पाटेकर कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला.

# मुखेड मध्ये पदवीधर निवडणुकीच्या प्रचाराला गालबोट आमदारांच्या गाडीला काळे झेंडे

## मुखेड तालुका तात्काळ दुष्काळ जाहीर करून ट्रिगर-१ च्या सवलती लागू करा - राजमुद्रा संघ

मुखेड / मनोज बिरादार

मुखेड तालुका येथे आज पदवीधर मतदारसंघाच्या प्रचारासाठी आलेले विधान परिषदेचे आमदार विक्रम काळे व मुखेडचे आमदार तुषार राठोड यांच्या ताफ्याला राजमुद्रा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी काळे झेंडे दाखवून तीव्र निषेध केला यावेळी एकच खळबळ उडाली.

मुखेड तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती असताना शासनाने मुखेडला ट्रिगर-१ मधून वगळले आहे. शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस, तूर पीक ज्वारी जळून खाक झाले आहे. शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर असताना लोकप्रतिनिधी केवळ निवडणुकीच्या प्रचारापुरते मुखेडमध्ये येतात असा संताप व्यक्त करत राजमुद्रा संघाच्या कार्यकर्त्यांनी मुखेड तालुका दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे ट्रिगर-१ लागू झालाच पाहिजे अशा जोरदार घोषणा दिल्या.

आमदारांच्या गाड्या अडवून राजमुद्रा संघाने निवेदनही दिले जोपर्यंत मुखेड तालुक्याला ट्रिगर-१ नुसार २५% पीक विमा अग्रीम वीज बिल माफी आणि सर्व सवलती मिळत नाहीत तोपर्यंत



कोणत्याही राजकीय नेत्याला मुखेडमध्ये फिरू देणार नाही, असा सज्जड इशारा राजमुद्रा संघाने दिला आहे.यावेळी राजमुद्रा संघाचे अध्यक्ष सचिन पाटील इंगोले, शिप्रसाद पाटील तेलंग बालाजी पाटील वडजे, अशोक बच्चेवार, गिरीधर पाटील केरूरकर, संजू पाटील लादगेकर. प्रमोद पाटील वडजे, माधव हुगेवाड, च. ठ गोपनर, विरभद्र स्वामी, राजू वाघमारे, गणेश पाटील जुनने, वैभव इंगळे, साई इंगोले, सोनू गायकवाड, दीपक पाटील जुन्ने, सुनील भाऊ, सोहम भिसे, देवराव पवार, कपिल काटेवाड, विश्वजित इंगोले, यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.



## पीकविमा प्रतिनिधी के. मठवाले व सहायक कृषी अधिकारी व्ही. के. जोशी यांच्या उपस्थितीत

# उंद्री येथे सोयाबीन पीक कापणी प्रयोग संपन्न

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील अंबुलगा महसूल मंडळांतर्गत उंद्री प.दे. येथे यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन पीक कापणी प्रयोग यशस्वीरीत्या पार पडले. पीकविमा प्रतिनिधी के. मठवाले व सहायक कृषी अधिकारी व्ही. के. जोशी यांच्या उपस्थितीत अनियमित (रँडम) पद्धतीने निवड करण्यात आलेल्या शेतकरी दिगांबर नरसिंग कलेपवार व ज्ञानेश्वर माधवराव वडजे यांच्या शेतात हे प्रयोग घेण्यात आले.

यंदा अपुरा पाऊस आणि दुष्काळी परिस्थितीमुळे सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी पिके करपल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्यक्ष उत्पादनाची अचूक नोंद घेणाऱ्या पीक कापणी प्रयोगांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

यावेळी पीकविमा प्रतिनिधी के. मठवाले, सहायक कृषी अधिकारी व्ही. के. जोशी, सहायक कृषी अधिकारी सुनील श्रंगारे, सहायक अधिकारी अमोल जलधावार, पोलीस पाटील प्रतिनिधी नरसिंग वादे, हणमंत गन्लेवार, मारोती पा. मटके, माजी उपसरपंच बालाजी पा. भोकरे, ज्ञानेश्वर पा. वडजे, नारायण पा. वडजे, शिवाजीराव पंदनवाड, श्रीराम पा. वडजे, निळकंठ कनंजे, परमेश्वर वडजे, बालाजी कनंजे, राम वडजे, उमाकांत सूर्यवंशी, बळीराम पा. कौडगावे, धोंडीबा कौडगावे, गणेश पसारे, ख्वाजा शेख आदी उपस्थित होते.

दुष्काळामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता असताना, पीक कापणी प्रयोगातून प्रत्यक्ष उत्पादनाचे वास्तव समोर येऊन पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार पीकविमा भरपाईचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# परतूरच्या वाहतूक शिस्तीसाठी प्रभारी आयपीएस अधिकाऱ्यांची धडक कारवाई

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मनःपूर्वक आभार सहा महिन्यांनंतरही जालना जिल्ह्यात नियुक्ती देण्याची मागणी

परतूर ।प्रतिनिधी

परतूर शहरातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रभारी आयपीएस अधिकाऱ्यांनी धडक कारवाई सुरू केली असून त्यांच्या या पुढाकाराचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे.रेल्वे स्टेशन ते परतूर गाव या मुख्य रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी कारवाई केली. तसेच संबंधित दुकानदारांना समज देत रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या.या कारवाईमुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला शिस्त लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.परतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी म्हणून सहा महिन्यांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी नियुक्त झालेल्या आयपीएस अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच शहरातील वाहतूक नियंत्रणावरही लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या कार्यकाळात पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात येत असून आता मुख्य रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवरही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.परतूर शहरातील मुख्य रस्त्यावर दुकानांसमोर वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने वाहने उभी केली जात असल्याच्या तक्रारी होत्या.मनमानी पद्धतीने पार्किंग करणे वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे आणि बेफाम वेगाने वाहने चालविणे यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. परिणामी, शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जालना जिल्हा शाखेच्या वतीने संबंधित प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर पोलिसांकडून प्रत्यक्ष कारवाई होत असल्याने मनसेने समाधान व्यक्त केले असून संबंधित प्रभारी आयपीएस अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.सहा महिन्यांनंतरही जालना जिल्ह्यातच नियुक्ती द्या प्रशिक्षणाचा सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही संबंधित आयपीएस अधिकाऱ्यांना जालना जिल्ह्यातच नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था वाहतूक नियंत्रण आणि अवैध धंद्यांविरोधातील कारवाईला सातत्य मिळणे आवश्यक असल्याने या अधिकाऱ्यांना जिल्ह्यातच पुढील जबाबदारी देण्याची अपेक्षा मनसेने





व्यक्त केली आहे.नियम पाळणाऱ्यांना त्रास नको, नियम मोडणाऱ्यांवर कारवाई हवी! हीच मनसेची भूमिका असल्याचे स्पष्ट करण्यात आले.परतूर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध आणि सुरक्षित करण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या कारवाईचे स्वागत करत ही मोहीम केवळ काही दिवसांपुरती मर्यादित न राहता सातत्याने सुरू ठेवावी अशी अपेक्षाही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# कोल्हापूरमध्ये गांजा विक्रीचा डाव उधळला, दोन तरुण अटकेत.!

## १० किलो गांजासह दुचाकी व तीन मोबाईल जप्त, ६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

सनी लोंढे । सांगली मीडिया

कोल्हापूर : नशामुक्त कोल्हापूर मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने माळीवाडा, उजगाव येथे सापळा रचून गांजा विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना अटक केली. राम महती सावंत (वय २१) आणि राज गणेश पारगे (वय २२), दोघेही रा. शिरोली पुलाची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून १० किलो गांजा, एक क्सेस दुचाकी आणि तीन मोबाईल हँडसेट असा एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गोपनीय माहितीवरून कारवाई..

पोलीस अंमलदार वैभव पाटील आणि प्रदीप पाटील यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांनी पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार संशयितांना ताब्यात घेऊन पंचांच्या उपस्थितीत जप्तीची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आरोपी कोल्हापूर शहर व परिसरात गांजा विक्री करत असल्याची माहिती



चौकशीत समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी गांधीनगर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ व मनःप्रभावी पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव आणि करवीर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या कारवाईत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण, गांधीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कैलास कोडग, पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव, पोलीस अंमलदार वैभव पाटील, प्रदीप पाटील, महेंद्र कोरे, सत्यजित तानुगडे, संतोष बरगे, संदीप सावंत, विशाल खराडे, शिवानंद मठपती, रवि लबे, गजानन गुरव, सत्यजित सावंत, सागर चौगले, अशोक पवार, अरविंद पाटील, महादेव कुर्हाडे आणि अरुण धनगर यांनी सहभाग घेतला.

# शुद्ध व सात्विक अन्नाची आज समाजाला गरज- ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मस्के

## 'संताजी जगनाडे नैसर्गिक तेल घाण्याचे' भव्य उद्घाटन संपन्न

बीड (प्रतिनिधी)

आजच्या धावपळीच्या आणि भेसळीच्या युगात मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. अशा काळात निरोगी आरोग्यासाठी प्रत्येकाने शुद्ध आणि सात्विक आहाराला प्राधान्य देणे गरजेचे आहे. घाण्याचे शुद्ध तेल हे आरोग्यासाठी अमृतसमान असून, या नैसर्गिक तेल घाण्याच्या माध्यमातून नागरिकांना उत्तम आरोग्य लाभेल, असा विश्वास महादेव मळी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.गुरुवर्य पुरुषोत्तम महाराज मस्के यांनी व्यक्त केला.

बीड शहरातील राजीव गांधी चौक येथे नवीन सुरू करण्यात आलेल्या 'संताजी जगनाडे नैसर्गिक तेल घाण्याचे' भव्य उद्घाटन ह.भ.प. गुरुवर्य पुरुषोत्तम महाराज मस्के यांच्या शुभहस्ते सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ रोजी संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज म्हणाले की, घाण्याचे शुद्ध तेल आरोग्यासाठी अमृतसमान मानले जाते, कारण ते कोणत्याही केमिकल किंवा अति उष्णतेशिवाय नैसर्गिक पद्धतीने काढले जाते. आजकाल बाजारात मिळणार्या रिफाइंड तेलाच्या तुलनेत घाण्याचे तेल शरीराला निरोगी ठेवण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरु शकते असेही ते म्हणाले.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे




म्हणून श्रेणीक खिंवसरा, धनंजय कुलकर्णी, दत्तात्रय कवचट सर, अ‍ॅड. गोपाळ म्हात्रे, यादव सर, श्रीकृष्ण जोशी सर, यांच्यासह या उद्घाटन सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर, राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.ग्राहकांना मिळणार शुद्धतेची हमी

या नैसर्गिक तेल घाण्यामध्ये शेंगदाणा, करडई, सूर्यफूल, मोहरी, आणि तीळ यांपासून पूर्णपणे नैसर्गिक व थंड पद्धतीने तेल काढले जाणार आहे. यामध्ये कोणत्याही रासायनिक प्रक्रियेचा किंवा भेसळीचा वापर न करता, ग्राहकांना थेट डोळ्यांदेखत शुद्ध तेल उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती संचालक शंकर धोंडीराम लांडे यांनी दिली. या नवीन व्यवसायाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आणि नागरिकांनी संचालकांचे कौतुक केले.

# बीडमध्ये आज १३ ऑक्टोबर रोजी 'किशोर कुमार की यादे' संगीत मैफलीचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

हिंदी चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आणि लोकप्रिय पार्श्वगायक, अभिनेते व संगीतप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवणारे स्वर्गीय किशोर कुमार यांच्या अजरामर गीतांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी बीडमध्ये 'किशोर कुमार की यादे' या विशेष संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. किशोर कुमार फॅन्स क्लब व कलाकार ग्रुप, बीड यांच्या वतीने मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार असून, संगीतप्रेमींना या मैफलीचा आनंद विनामूल्य घेता येणार आहे.

किशोर कुमार यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतंत्र ओळख निर्माण केली. प्रेमगीतांपासून विरहगीतांपर्यंत, विनोदी गीतांपासून भावस्पर्शी रचनांपर्यंत विविध प्रकारच्या गीतांना त्यांनी आपल्या आवाजाने वेगळी उंची दिली. आजही त्यांची गाणी अनेक पिढ्यांच्या ओठांवर असून, त्यांच्या गीतांमधील भावविश्व रसिकांना मंत्रमुग्ध करते. याच अजरामर संगीताचा अनुभव बीडकरांना मिळावा, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या संगीत मैफलीत आशा भारती, अस्मिता अहिरे, मिस तनिष्का, अश्विनी गवळी, रतन सवाई, शाम माने आणि डॉ. सुधीर साळवी हे गायक किशोर कुमार यांच्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करणार आहेत. या कलाकारांच्या सुरेल आवाजातून किशोरदांच्या गाजलेल्या गीतांचा आनंद रसिकांना अनुभवता येणार आहे.

कार्यक्रमाला समाजसेवक जावेद भैय्या कुरेशी, प्रमुख अतिथी किशोर कागदे आणि फारूकअली पटेल यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी बबनराव वडमारे आणि ड. अविनाश गडगे यांनी सांभाळली आहे.हा कार्यक्रम हॉटेल ऑलिव्ह हॉल, तिसरा मजला, नगर रोड, बीड येथे होणार आहे. प्रवेश विनामूल्य असल्याने शहरातील तसेच परिसरातील संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मैफलीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'भाग्यलक्ष्मी इव्हेंट्स' तर्फे भव्य दांडिया व गरबा नाईट्सचे आयोजन

एकूण ७७,७७७ रुपयांची बक्षिसे

गेवराई (प्रतिनिधी) - नवरात्रोत्सवानिमित्त गेवराईतील भाग्यलक्ष्मी लॉन्स, कोल्हेर रोड येथे भाग्यलक्ष्मी इव्हेंट्सतर्फे दि.१३,१४ व १५ ऑक्टोबर रोजी भव्य 'दांडिया गरबा नाईट्स २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे.

महिला व तरुणींसाठी विशेष आकर्षण असलेल्या या तीन दिवसीय गरबा-दांडिया महोत्सवात विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील डान्स स्पर्धेची विजेती आदिती केंद्रे यांची उपस्थिती हि विशेष आकर्षण




ठरणार आहे. तसेच आकर्षक साऊंड सिस्टीम, लाईट्स, सेल्फी पॉईंट, फूड स्टॉल, प्रोफेशनल सिक्युरिटी आणि आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे.

या महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिलांसाठी व मुलींसाठी विविध बक्षिसे ठेवण्यात आली असून, एकूण ७७,७७७ रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. तसेच लकी ड्रॉद्वारे १११ भेटवस्तू देण्यात येणार आहेत. व काही सरप्राइज गिफ्ट ठेवण्यात आले आहे. वेगवेगळ्या प्रवेश शुल्काची व्यवस्था करण्यात आली असून, एक दिवसासाठी १५१ रुपये एक दिवस तर तीन दिवसांसाठी व स्पर्धेसाठी ३९९ रुपये प्रवेश शुल्क आहे. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला व तरुणींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# नवरात्रोत्सवात ज्योत घेऊन येणाऱ्या देवीभक्तांचे आ.सुरेश आण्णा धस यांच्या वतीने स्वागत

## अद्वैतचंद्र निवासस्थानाशेजारी चहा,बिस्किटे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वानिमित्त तुळजापूर येथील आई तुळजाभवानी मातेची पवित्र ज्योत घेऊन जाणाऱ्या देवीभक्तांचे लोकनेते आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. आष्टी येथील आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानाशेजारी ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांसाठी चहा, बिस्किटे आणि पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था करण्यात आली होती. धार्मिक श्रद्धा, भक्ती आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमातून भाविकांप्रती असलेली आपुलकी व्यक्त करण्यात आली.



नवरात्रोत्सव हा महाराष्ट्रातील लाखो भाविकांच्या श्रद्धेचा आणि भक्तिभावाचा महत्त्वपूर्ण उत्सव आहे. या काळात तुळजापूर येथील आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तसेच मातेची पवित्र ज्योत घेऊन जाण्यासाठी विविध गावांमधून आणि परिसरांतून देवीभक्त मोठ्या श्रद्धेने प्रवास करतात. हातात मातेची ज्योत, मुखात आई तुळजाभवानीचा जयघोष आणि मनात अढळ श्रद्धा घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या या भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा, त्यांना वाटेत थोडा विसावा मिळावा आणि त्यांच्या पिण्याच्या पाण्यासह अल्पोपहाराची सोय व्हावी, या भावनेतून ही व्यवस्था करण्यात आली होती.

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानाशेजारी करण्यात आलेल्या या व्यवस्थेमुळे ज्योत घेऊन जाणाऱ्या देवीभक्तांना काही काळ विसावा घेण्याची संधी मिळाली. यावेळी भाविकांचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना चहा, बिस्किटे आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात आले. धार्मिक परंपरेचा सन्मान राखतानाच भक्तांच्या सेवेला प्राधान्य देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

नवरात्रोत्सवाच्या काळात देवीभक्त मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने प्रवास करतात. अनेकदा लांबचा प्रवास, उन्हाचा त्रास आणि शारीरिक थकवा यांचा सामना करावा लागतो. अशा वेळी भाविकांसाठी पाणी, चहा आणि अल्पोपहाराची व्यवस्था केल्याने त्यांना दिलासा मिळतो. भाविकांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची भावना अधोरेखित झाली.

या उपक्रमावेळी आमदार सुरेश आण्णा धस, नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश भाऊ सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष भारत भाऊ मुरकुटे, सभापती शरीफ भाई शेख यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकारी उपस्थित होते. उपस्थितांनी देवीभक्तांचे स्वागत करून त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमात सहभाग घेतला.

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक विधी आणि उत्सवापुरता मर्यादित नसून तो भक्ती, समर्पण, सामाजिक एकोपा आणि सेवाभावाची शिकवण देणारा उत्सव आहे. देवीच्या चरणी श्रद्धा अर्पण करतानाच देवीभक्तांची सेवा करणे, त्यांच्या प्रवासात मदतीचा हात देणे आणि त्यांना आपुलकीची वागणूक देणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. आई तुळजाभवानी मातेची पवित्र ज्योत घेऊन जाणाऱ्या भाविकांचे स्वागत करून त्यांच्यासाठी चहा, बिस्किटे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याने धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. भक्तांच्या सेवेतून माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमामुळे नवरात्रोत्सवातील भक्तिभावाला सेवाभावाची जोड मिळाली.



# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर मुंबईत महत्त्वपूर्ण चर्चा.!

मुंबई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या आणि जनतेच्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी मुंबई येथे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री, विधिमंडळ उपनेते तथा बीड जिल्ह्याचे संपर्कमंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांच्या सुरूची येथील निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

या बैठकीत बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा मिळावा आणि विविध समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व्हाव्यात, यासंदर्भात बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.

या बैठकीस बीड जिल्हा संपर्कप्रमुख तथा ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक मनोज शिंदे, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत आप्पा नवले, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळुक, माजी आमदार तथा शिवसेना उपनेत्या श्रीमती संगीताताई ठोंबरे, मराठवाडा शिवसेना निरीक्षक तथा लोकसभा प्रमुख बाजीराव चव्हाण, शिवसेना महिला आघाडी बीड जिल्हाप्रमुख श्रीमती प्रतिभाताई थोरात, शिवसेना महिला संपर्कप्रमुख श्रीमती संगीताताई चव्हाण आणि बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांची उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, जिल्ह्यातील प्रश्न शासनदरबारी प्रभावीपणे मांडून नागरिकांना दिलासा मिळवून देण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.





## आष्टी तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांबाबत मनसे आक्रमक दोषींवर कारवाईची मागणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये कथित आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) केला आहे. याप्रकरणी मनसेचे जिल्हाध्यक्ष कैलास दत्तात्रय दरेकर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी यांना निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे.

रस्त्यांवरील माहिती फलक, मीटर स्टोन, काँक्रीट पाईप तसेच मजुरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक साधनांबाबत अनियमितता झाल्याचा संशय मनसेने व्यक्त केला आहे. संबंधित कामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करून कागदपत्रे, मोजमाप आणि देयकांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.चौकशीत गैरव्यवहार आढळल्यास संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करून अपहार झालेली रक्कम वसूल करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

१५ दिवसांत चौकशीची कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कैलास दत्तात्रय दरेकर यांनी दिला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी मनसेने केली आहे.

# ऑक्टोबर अखेर महेश सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरु होणार-माजी आ.भीमराव धोंडे

## कारखाना सुरू झाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा-माजी आ.बाळासाहेब आजबे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील महेश सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ मधील २६ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा सोमवारी कारखाना परिसरात उत्साहात पार पडला. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस कारखान्याचा गळीत हंगाम सुरू होणार असून, शेतकऱ्यांनी आपला ऊस याच कारखान्याला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. कारखाना सुरू झाल्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न मिटणार असल्याचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले.माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात ह.भ.प. विठ्ठल महाराज गहिनीनाथ गड, ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल आणि ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांच्या हस्ते धार्मिक विधीने बॉयलरचे अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी भीमराव धोंडे यांनी कारखाना सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी धीर धरून आपला ऊस कारखान्याला द्यावा, असे आवाहन केले. बाळासाहेब आजबे यांनी कारखाना सुरू करण्यासाठी धोंडे यांनी मोठे धाडस केल्याचे सांगितले. ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी कारखाना म्हणजे शेतकऱ्यांची ऊर्जाशक्ती असल्याचे सांगितले. ह.भ.प. विठ्ठल महाराज, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, ह.भ.प. अशोक महाराज भोसले आणि ह.भ.प. आंधळे महाराज यांनीही मनोगत व्यक्त करून कारखाना सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे नमूद केले.




कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती नियामत बेग, चेअरमन राजेश धोंडे, ह.भ.प. दिनकर तांदळे महाराज, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथ वनवे, माजी पंचायत समिती सदस्य परमेश्वर शेळके, बाबुलाल भंडारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, दीपक घुमरे, संचालक रत्नदीप निकाळजे, विधाते, वाघुले, राजाराम नन्नवरे, अंकुश मुंढे, पांडुरंग गावडे, माजी सरपंच संतोष चव्हाण, राजाबापू नलावडे, अण्णासाहेब चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील नाथ, माजी संचालक दत्तोबा शिंदे, भाऊसाहेब घुले, संजय मेहेर, सुकलाल मुथा, विजय मेहेर, माजी सरपंच झुंबर चव्हाण, धैर्यशील थोरवे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, विक्रम पोकळे, सतीश झगडे, हरिभाऊ जंजिरे, अरुण सायकड, माजी सभापती बाबासाहेब आंधळे, अशोक साळवे, माजी संचालक बाळासाहेब वाघुले, भागिनाथ विधाते, स्वामी सानप, राजपाल शेंडगे, मोहन कर्डीले, बाळासाहेब खुडे, लिंबराज कर्डीले, चेअरमन बाळासाहेब शिंदे, सुदाम झिंजुर्के, चेअरमन शाम सांगळे, मच्छिंद्र शेळके, पंढरीनाथ चंदनशिव, सुनील शिंदे, संदीप नागरगोजे, विठ्ठल लांडगे, कुंडलीक आस्वर, बाळासाहेब भुकन, भाऊसाहेब देसाई, बाबासाहेब तावरे, मच्छिंद्रनाथ शेळके, वैभव बडे, तुकाराम चव्हाण, आबासाहेब तावरे, बबनराव सांगळे, गहिनीनाथ आंधळे, सदाशिव आंधळे, अमोल चौधरी, सोनाजी गांजुरे, सदाशिव पवने, गौतम ससाने, कार्यकारी संचालक गिरीश झगडे आणि संतोष गोल्हार यांच्यासह कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी थोरवे यांनी केले, तर आभार माजी शिक्षण सभापती नियामत बेग यांनी मानले.

# जिद्दीच्या जोरावर स्वप्नांना गवसणी.! तासगावच्या निकिता वाघमारे यांची प्रेरणादायी कामगिरी

## क्लास न लावता घरीच अभ्यास करून पहिल्याच प्रयत्नात पोलीस दलात निवड,निर्भया पथकाच्या माध्यमातून मुलींच्या सुरक्षेसाठी योगदान

सनी लोंढे । सांगली मीडिया

तासगाव, जि. सांगली : शेतकरी कुटुंबातील आर्थिक अडचणींवर मात करत, कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय घरीच अभ्यास करून पहिल्याच प्रयत्नात पोलीस दलात निवड मिळवणाऱ्या कांबळेवाडी येथील निकिता वाघमारे यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. २०११ पासून महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या निकिता सध्या तासगाव पोलीस ठाण्याच्या निर्भया पथकात सेवा बजावत आहेत.

भावाच्या यशातून मिळाली प्रेरणा.!

२००७ मध्ये निकिता यांच्या भावाची पोलीस दलात निवड झाली. त्यातून प्रेरणा घेत त्यांनीही पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही त्यांनी घरीच अभ्यास व सराव करून पहिल्याच प्रयत्नात सांगली पोलीस दलात यश मिळवले. त्यांचे प्रशिक्षण नागपूर येथे पूर्ण झाले.

निर्भया पथकातून मुलींच्या सुरक्षेसाठी पुढाकार.!

२०१३ ते २०२१ या काळात त्यांनी सांगली पोलीस मुख्यालयात काम केले. २०२१ पासून त्या तासगाव पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. निर्भया पथकाच्या माध्यमातून शाळा-महाविद्यालयांत विद्यार्थिनींना महिला सुरक्षा, कायदे, छळाविरोधात तक्रार करण्याचे महत्त्व आणि सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन केले जाते. मुलींची छेडछाड करणाऱ्यांना समज देणे तसेच आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई करणे, यासाठीही पथक कार्यरत आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्तव्य.!

सांगली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बारवकर,



तासगाव उपविभागीय पोलीस अधिकारी किरण अवचर, तासगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल टकले तसेच तासगाव वाहतूक शाखा व निर्भया पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक विशाल भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली निकिता वाघमारे आपले कर्तव्य बजावत आहेत.संघर्षातून यशापर्यंतचा प्रवास.!

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःचे स्वप्न साकार करणाऱ्या निकिता वाघमारे यांची वाटचाल ग्रामीण भागातील तरुणींसाठी प्रेरणादायी आहे. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध केले असून त्यांच्या कार्याला क्राइम डायरी परिवाराचा मानाचा सलाम!

शेतकरी कुटुंबातील आर्थिक अडचणींवर मात करत, कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय घरीच अभ्यास करून पहिल्याच प्रयत्नात पोलीस दलात निवड मिळवणाऱ्या कांबळेवाडी येथील निकिता वाघमारे यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. २०११ पासून महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेल्या निकिता सध्या तासगाव पोलीस ठाण्याच्या निर्भया पथकात सेवा बजावत आहेत.



# सप्तशृंगी गडावरून ३०० किलोमीटर पायी चालत आणली ज्योत, सावळदबारा येथे युवकांचे उत्साहात स्वागत

सावळदबारा (प्रतिनिधी)

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील युवकांनी नवरात्रोत्सवानिमित्त श्री सप्तशृंगी माता गड, वणी येथून तब्बल ३०० किलोमीटर पायी चालत ज्योत गावात आणली. रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी गावात आगमन होताच ढोल-ताशांच्या गजरात युवकांचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी रांगोळ्या काढून ज्योतीचे दर्शन घेतले.

भारतीय जनता पक्षाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी युवकांचे स्वागत केले. यावेळी सागर कुल्ली, योगेश टिकारे, गणेश नरोटे, संदीप कोलते, मुकेश रावळकर, तुकाराम खिरडकर, पियुष कोते, सुनील लांडगे, गोपाल सपाटे, पवन कुल्ली, अक्षय खराटे, हर्षल सपाटे, कृष्णा सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सावळदबारा जवळील टिटवी-वाढोणा येथील श्री कालिंका देवी मंदिरातूनही सावळदबारा व परिसरातील विविध गावांतील युवकांनी ज्योत आणली. या ज्योतीचेही ग्रामस्थांनी दर्शन घेतले. या युवकांचे स्वागतही गुलाबराव पाटील कोलते यांनी केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना श्रद्धांजली

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जतन करत रुपेरी पटावर अदाकारी आणि चतुरस्त्र अभिनयाने आपली ओळख निर्माण करणारी तारका निमाल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केली आहे.'लोककला, रंगभूमी ते चित्रपट सृष्टी असा मधू कांबीकर यांचा कला प्रवास राहीला. लोककलेतील लावणीचा पारंपरिक बाज जपत त्यांनी कथ्थकच्या अभ्यासातून नृत्यांगना म्हणून लौकिक मिळविला. लावणीला आपल्या नृत्य शैलीने आणि नजाकतीने दिमाख मिळवून दिला. रुपेरी पडद्यावरही त्यांनी लावणीचे रूप आणखी खुलवून दाखविले. त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत कसदार अभिनयाने अनेक वैविध्यपूर्ण भूमिका समर्थपणे साकार केल्या. कांबीकर यांचा कला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आणि या क्षेत्रातील दोन पिढ्यांसाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी असा राहीला आहे. ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन कला क्षेत्राची मोठी हानी असून, मराठी लोक कलेची पताका रुपेरी पडद्यावर दिमाखाने फडकत ठेवणारी चतुरस्त्र तारका निमाली आहे. आम्ही कांबीकर कुटुंबीय आणि मधूताईंच्या चाहत्यांच्या दुःखात सहभागी असून या सर्वांना हा आघात सहन करण्याची शक्ती ईश्वराने शक्ती द्यावी अशी प्रार्थना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू काबीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



# तीन कन्यांच्या संगोपनातून स्त्रीशक्तीचा आदर्श घालणाऱ्या श्रीमती सुजाताताई झगडे

## 'मुलगा-मुलगी भेदभाव नको;माझ्या मुलीच माझ्यासाठी लक्ष्मीचे रूप':श्रीमती सुजाताताई झगडे

आष्टी - नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीचा जागर, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि नारीशक्तीच्या सामर्थ्याचा गौरव करण्याचा पवित्र उत्सव! या नऊ दिवसांत आपण आदिमायेच्या विविध रूपांची भक्तिभावाने पूजा करतो. मात्र, आपल्या आजूबाजूला अशा अनेक महिला आहेत, ज्या आपल्या कर्तृत्वातून, विचारांतून आणि संस्कारांतून स्त्रीशक्तीचे खरे दर्शन घडवतात. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता मुलींना आत्मविश्वासाने घडविणाऱ्या आणि त्यांच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या अशाच एका प्रेरणादायी मातेचे नाव आहे श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे.बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सोलेवाडी येथील रहिवासी असलेल्या श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे या एक आदर्श माता, कर्तव्यदक्ष गृहिणी आणि समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांना तीन मुली आहेत. मात्र, मुलगा नसल्याची खंत मनात बाळगण्याऐवजी त्यांनी आपल्या तिन्ही मुलींनाच आपल्या आयुष्याचे सर्वस्व मानले आहे. मुलींना प्रेम, माया, उत्तम संस्कार आणि शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनविण्याचा त्यांचा प्रयत्न खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे.

**- नवरात्र विशेष -**
**राजेंद्र लाड,आष्टी**
(९४२३१७०८८५)

आजही समाजातील काही घटकांमध्ये मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जातो. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे दुसऱ्याचे धन, अशा जुनाट विचारसरणीला छेद देण्याची गरज आहे. मुलगी ही कोणत्याही बाबतीत मुलापेक्षा कमी नसते, हे आपल्या आचरणातून सिद्ध करणाऱ्या श्रीमती सुजाताताई झगडे यांचे विचार समाजाला नवी दिशा देणारे आहेत. त्या नेहमी सांगतात, मुलगा आणि मुलगी असा भेदभाव कधीही नसला पाहिजे. माझ्या मुली माझ्यासाठी लक्ष्मीचे रूप आहेत. मी त्यांचा मुलाप्रमाणेच सांभाळ करते. त्यांना चांगले शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करणे, हीच माझी इच्छा आहे. त्यांच्या या विचारांतून मुलींबद्दलचे प्रेम, त्यांच्यावरील विश्वास आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याची तळमळ स्पष्टपणे दिसून येते. मुलगा-मुलगी समानतेचा संदेश केवळ भाषणांतून न देता तो प्रत्यक्ष जीवनात जगून दाखविणाऱ्या श्रीमती सुजाताताई झगडे या खऱ्या अर्थाने आदर्श मातृत्वाचे प्रतीक आहेत.

श्रीमती सुजाताताई झगडे यांच्या कुटुंबातील तिन्ही मुली शिक्षण घेत असून अभ्यासातही हुशार आहेत. त्यांची मोठी मुलगी कु. सारथी विजयकुमार झगडे हिने बारावीचे शिक्षण पूर्ण केले आहे. तिचे पुढील ध्येय डॉक्टर होण्याचे आहे. आपल्या मुलीने वैद्यकीय क्षेत्रात जाऊन समाजाची सेवा करावी, हे तिचे स्वप्न तिच्या मेहनतीने आणि योग्य मार्गदर्शनाने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आहे. दुसरी मुलगी कु. संस्कृती विजयकुमार झगडे ही सध्या इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत आहे, तर तिसरी मुलगी कु. सृष्टी विजयकुमार झगडे ही इयत्ता सहावीमध्ये शिकत आहे. या तिन्ही मुलींनी पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला, आष्टी येथेच शिक्षण घेतले असून त्या शाळेच्या शैक्षणिक वातावरणात घडत आहेत. मुलींच्या शिक्षणाला महत्त्व देणे, त्यांच्यातील गुण ओळखणे आणि त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देणे, हीच श्रीमती सुजाताताई झगडे यांच्या पालकत्वाची खरी ताकद आहे. मुलींना केवळ मोठे करण्यापेक्षा त्यांना आत्मविश्वासाने जगायला शिकविणे, चांगले संस्कार देणे आणि भविष्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रेरित करणे अधिक महत्त्वाचे असते. श्रीमती सुजाताताई झगडे यांची आपल्या मुलींबाबतची भूमिका याच सकारात्मक विचारसरणीचे दर्शन घडवते.

श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कुटुंबापुरते मर्यादित नाही. आपल्या मुलींच्या शिक्षणाबरोबरच शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठीही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या यापूर्वी पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला, आष्टी येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. या कार्यकाळात त्यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी बहुमोल मार्गदर्शन केले आणि शाळेच्या विकासासाठी सहकार्य केले. विद्यार्थिनींचे शिक्षण, शाळेची प्रगती आणि शैक्षणिक वातावरण अधिक चांगले होण्यासाठी पालकांनीही पुढाकार घ्यावा, या भूमिकेतून त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. सध्या त्यांचे पती श्री. विजयकुमार झगडे हे याच शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. पती-पत्नी दोघांचाही शाळेशी असलेला हा संबंध त्यांच्या शिक्षणाविषयीच्या आस्थेची साक्ष देतो. कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देतानाच शाळेच्या प्रगतीसाठीही योगदान देणारे हे कुटुंब निश्चितच कौतुकास पात्र आहे.श्रीमती सुजाताताई झगडे यांच्या तिन्ही मुली अभ्यासात हुशार असून शिक्षकांच्या लाडक्या आहेत. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत घरातील वातावरण, पालकांचे संस्कार आणि शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन या तिन्ही गोष्टी महत्त्वाच्या असतात. झगडे कुटुंबात मुलींना मिळणारे प्रोत्साहन आणि शिक्षणाविषयीची सकारात्मक भूमिका त्यांच्या प्रगतीसाठी निश्चितच पूरक ठरत आहे. पालकांनी मुलांच्या गुणांचे कौतुक करावे, त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि अपयश आले तरी त्यांना पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा द्यावी. विशेषतः मुलींना स्वतःच्या क्षमता ओळखण्याची संधी दिल्यास त्या प्रत्येक क्षेत्रात यश मिळवू शकतात. श्रीमती सुजाताताई झगडे यांची आपल्या मुलींप्रती असलेली भूमिका याच संदेशाला बळ देणारी आहे.नवरात्रोत्सवात आपण देवीच्या नऊ रूपांची आराधना करतो. आदिशक्ती ही धैर्य, सामर्थ्य, माया, करुणा आणि संकटांवर मात करण्याच्या शक्तीचे प्रतीक आहे. एका आईमध्येही ही सर्व रूपे अनुभवायला मिळतात. मुलांच्या सुखासाठी झटणारी, त्यांच्या भविष्याची चिंता करणारी, त्यांच्या यशात आनंद मानणारी आणि त्यांना घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारी आई हीच कुटुंबाची खरी शक्ती असते. श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे यांनी आपल्या तिन्ही मुलींना समान प्रेम, माया आणि शिक्षणाची संधी देण्याची भूमिका स्वीकारली आहे. त्यांच्यासाठी मुलगा किंवा मुलगी हा प्रश्न नसून आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, उत्तम संस्कार आत्मसात करावेत आणि जीवनात यशस्वी व्हावे, हीच महत्त्वाची बाब आहे. त्यांच्या या विचारांतून नवरात्रोत्सवाचा खरा संदेशही अधोरेखित होतो. देवीची पूजा करताना घरातील मुलींचा सन्मान करणे, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना समान संधी उपलब्ध करून देणे, हीच स्त्रीशक्तीची खरी आराधना आहे.

आदर्श कुटुंब म्हणजे केवळ आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेले कुटुंब नव्हे, तर ज्या कुटुंबात प्रेम, विश्वास, समानता, शिक्षण आणि संस्कारांना महत्त्व दिले जाते, ते खऱ्या अर्थाने आदर्श कुटुंब असते. मुलगा असो वा मुलगी, प्रत्येकाला समान सन्मान आणि प्रगतीची संधी देणाऱ्या कुटुंबातूनच सुदृढ समाजाची निर्मिती होते. सोलेवाडी येथील श्रीमती सुजाताताई आणि श्री. विजयकुमार झगडे यांचे कुटुंब याच सकारात्मक विचारांचे दर्शन घडवते. तीन मुलींचे संगोपन करताना त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, मुलींना आपल्या आयुष्याचा अभिमान मानणे आणि शाळेच्या विकासातही योगदान देणे, या बाबी त्यांच्या कुटुंबाचे वेगळेपण अधोरेखित करतात. समाजात मुलगा-मुलगी समानतेचा विचार रुजवायचा असेल, तर त्याची सुरुवात प्रत्येक घरातून झाली पाहिजे. मुलगी जन्माला आली म्हणून दुःख करण्याऐवजी तिच्या जन्माचे स्वागत करणे, तिला शिक्षण देणे, तिच्या स्वप्नांना बळ देणे आणि तिला स्वतःच्या पायावर उभे करणे, ही प्रत्येक पालकाची जबाबदारी आहे.मुलगी ही ओझे नसून कुटुंबाचा अभिमान आहे, हा विचार समाजाच्या मनामनांत रुजविण्याची आज गरज आहे. श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे यांचे जीवन आणि त्यांच्या कुटुंबाची विचारसरणी या परिवर्तनाची प्रेरणा देणारी आहे. नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर अशा आदर्श मातेचा गौरव करणे म्हणजे स्त्रीशक्तीचा सन्मान करणे होय. आपल्या तिन्ही मुलींना प्रेमाने वाढविणाऱ्या, त्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या आणि समाजासमोर समानतेचा आदर्श ठेवणाऱ्या श्रीमती सुजाताताई विजयकुमार झगडे यांचे कार्य अनेक कुटुंबांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या मुलींची शैक्षणिक प्रगती होवो, सारथीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार होवो आणि संस्कृती व सृष्टी यांच्याही स्वप्नांना यशाचे पंख लाभोत, हीच नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने सदिच्छा...!स्त्रीशक्तीचा सन्मान, मुलींचा अभिमान आणि समानतेचा विचार हाच खऱ्या अर्थाने नवरात्रोत्सवाचा संदेश आहे.

# बेकायदा अटक करू नका! सर्वोच्च न्यायालयाचे दिल्ली प्रशासनाला स्पष्ट निर्देश

## नेत्यांची सुटका, पण लढा थांबणार नाही! ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी सीजेपी आक्रमक

नवी दिल्ली : आंदोलनापूर्वीच ताब्यात घेण्याच्या कारवाईमुळे चर्चेत आलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या तीन नेत्यांची अखेर सुटका करण्यात आली. मात्र, या सुटकेसाठी त्यांना पुढील एक वर्ष शांतता भंग करणार नाही, अशी अट घालण्यात आली. अभिजीत दीपके, आशुतोष रांका आणि सौरभ दास या तिघांना रविवारी कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले होते. त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. विशेष म्हणजे, सुटकेनंतरही आंदोलन मागे घेण्याऐवजी नेत्यांनी आपला लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. जंतर-मंतरवरील प्रस्तावित आंदोलनापूर्वी या तिन्ही नेत्यांना विमानतळावर ताब्यात घेण्यात आले होते. त्यांच्याविरोधात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील कलम १२६ आणि १७० अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांना कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. वर्षभर शांतता भंग करणार नाही, या अटीवर त्यांची सुटका करण्यात आली. शांततेत एकत्र येणाऱ्या नागरिकांना बेकायदेशीररीत्या ताब्यात घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली प्रशासनाला दिल्याची माहिती समोर आली आहे. या निर्देशांमुळे शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि प्रतिबंधात्मक पोलिसी कारवाई यांमधील सीमारेषेवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.







### आंदोलनाला युद्ध बनवून टाकले - सौरव दास

'लोकांना शांततेत आंदोलन करून आपले म्हणणे मांडायचे आहे. सरकारने त्यांच्याशी चर्चा करायला हवी होती. त्यांचे ऐकले पाहिजे होते, पण मोदी-शहा इतके घाबरले आहेत की ते ऐकायला तयारच नाहीत. एका ज्ञानेश कुमारसाठी ते लाखो देशवासीयांना त्रास देत आहेत. राजाचा जीव पोपटात आहे हे त्यांनी सिद्ध केले आहे. स्वतंत्र भारतात कधीही असे झाले नव्हते. आपल्याच नागरिकांविरुद्ध सरकारने युद्ध पुकारल्याची स्थिती आहे. एक आंदोलन युद्धात रूपांतरित करणाऱ्या मोदी-शहांना लाज वाटली पाहिजे, असा हल्ला सौरव दास यांनी केला.

### राहुल गांधींचा आज सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा

१ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार यादीतील कथित 'मतचोरी' रोखण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. प्रेम, बंधुभाव आणि देशभक्तीच्या भावनेतून आपण एकत्र मोर्चा काढू. घाबरू नका, असे आवाहनही त्यांनी केले. या मोर्चात विरोधी पक्ष, नागरी समाजातील प्रतिनिधी आणि युवक सहभागी होतील, असे त्यांनी सांगितले. भारताच्या सरन्यायाधीशांना निवेदन देऊन मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाची प्रक्रिया थांबवण्याची मागणीही केली जाणार आहे.

### खासदार जॉन ब्रिटास यांचा पोलिसांनी गळा दाबला

'माकप'चे खासदार जॉन ब्रिटास यांना पोलिसांकडून मारहाण झाली आहे. पोलीस व्हॅनमध्ये सीआरपीएफच्या जवानांनी माझा गळा दाबण्याचा प्रयत्न केला, असा आरोप ब्रिटास यांनी केला आहे. ब्रिटास हे मीडियाशी बोलत असताना त्यांना अक्षरशः फरफटत नेऊन पोलीस व्हॅनमध्ये कोंबण्यात आले.

अटक नाही, माझे अपहरण केले- ध्रुव राठी

दिल्ली पोलिसांनी मला अटक केली नव्हती, तर माझे अपहरण केले होते. साध्या वेषातील २० ते २५ पोलिसांनी सकाळी सात वाजता घरात घुसून मला फरफटत नेले,' असा गंभीर आरोप यूट्यूबर ध्रुव राठी यांनी आज केला. त्यांना शनिवारी गुरुग्राम येथील घरातून ताब्यात घेण्यात आले होते.

# वालसावंगी ग्रामसभेत गोंधळाचा कळस नागरिकांचा संताप अनावर

## प्रश्न मांडण्याची संधीच न मिळाल्याने ग्रामस्थ आक्रमक पोलिस बंदोबस्तात सभा गुंडाळली पाच वर्षांच्या कामांच्या चौकशीची मागणी

भोकरदन इसरारखान

पठाण :- गावाच्या विकासाचे प्रश्न मांडण्यासाठी आयोजित केलेली ग्रामसभा नागरिकांच्या संतापामुळे वादळी ठरली. भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे झालेल्या ग्रामसभेत नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले. घोषणाबाजी आणि गदारोळामुळे सभेतील वातावरण तणावपूर्ण बनले. अखेर परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्तात ग्रामसभा गुंडाळण्यात आली. या प्रकारामुळे गावातील मूलभूत प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

वालसावंगी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. गावाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या सभेला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. गावातील रस्ते पाणीपुरवठा स्वच्छता घरकुल योजना आणि प्रलंबित विकासकामांसंदर्भात प्रश्न उपस्थित करून त्यावर ठोस उत्तरे मिळतील अशी नागरिकांची अपेक्षा होती. मात्र, नागरिकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नसल्याचा आरोप पुढे आल्याने सभेतील वातावरण तापू लागले.

प्रश्न अनुत्तरित ग्रामस्थांचा संताप वाढला

आपल्या गावातील समस्या मांडण्यासाठी ग्रामसभेसारखे लोकशाहीचे व्यासपीठ उपलब्ध असतानाही बोलण्याची संधी मिळत नसल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. यामुळे नागरिकांनी सभेतच प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. त्यातून ग्रामस्थ, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये जोरदार खडाजंगी झाल्याचे समोर आले. पाहता पाहता सभेचे कामकाज विस्कळीत झाले आणि घोषणाबाजीमुळे गोंधळ वाढत गेला.

परिस्थिती चिघळण्याची शक्यता लक्षात घेऊन पारध पोलिसांनी सभास्थळी बंदोबस्त ठेवला होता. वाढत्या गदारोळामुळे ग्रामसभेचे कामकाज पुढे चालवणे कठीण झाल्याने अखेर सभा गुंडाळण्यात आली. परिणामी अनेक नागरिकांना आपले प्रश्न मांडता आले नाहीत, तर गावातील विविध समस्यांवर ठोस निर्णय होण्याची अपेक्षाही अपूर्ण राहिली.

पाच वर्षांच्या कामांची चौकशी करा!

या घटनेनंतर ग्रामस्थ पंकज धामोने यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. लोकशाही मार्गाने नागरिकांना आपले प्रश्न मांडण्याचा अधिकार आहे. मात्र, ग्रामसभेतच हा अधिकार नाकारला जात असल्याची भावना निर्माण होणे ही गंभीर बाब आहे. गोंधळानंतर सभा गुंडाळल्यामुळे गावातील प्रश्न पुन्हा प्रलंबित राहिले आहेत, असे त्यांनी सांगितले.वालसावंगी ग्रामपंचायतीच्या मागील पाच वर्षांतील विकासकामांची



सखोल चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी लवकरच जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांची भेट घेणार असल्याचे धामोने यांनी स्पष्ट केले. मागण्यांची दखल न घेतल्यास आमरण उपोषण सुरू करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

फेरग्रामसभेची मागणी जोर धरू लागली

ग्रामसभा ही केवळ औपचारिकता न राहता नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरले पाहिजे, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. वालसावंगीतील घटनेमुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित झाले असून, ग्रामस्थांना पुरेशी संधी देऊन सर्व प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी फेरग्रामसभा आयोजित करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.आता प्रशासन या प्रकाराची दखल घेऊन ग्रामस्थांच्या तक्रारींचे निराकरण करणार की गावातील प्रश्न पुन्हा कागदावरच राहणार, याकडे वालसावंगी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# बीडमध्ये मंत्री रामदास आठवलेंची विराट सभा

## १६ ऑक्टोबर रोजी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे : शाम वीर

बीड ।प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्याची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी विराट जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत



बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या

विराट जाहीर सभेस बीड शहरातील रिपाइं पदाधिकारी, महिला गायरान धारक, विद्यार्थी, शेतमजूर यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाइं युवा नेते शाम वीर, अविनाश जोगदंड, संभाजी गायकवाड, विलास जोगदंड, प्रभाकर चांदणे, अड सुरेश वडमारे, नागेश (आण्णा) दुबळे, दिलीप खंदारे, भैय्यासाहेब मस्के,भैय्या साळवे, महेंद्र वडमारे, दयानंद उजगरे, अक्षय कोकाटे, मनोज बोराडे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, पप्पू वडमारे, के.के. कांबळे, आप्पा मिसळे, गौतम कांबळे, जितू धन्वे, संजय हनवते सोनू वडमारे, दिपक कांबळे, गणेश वाघमारे, अजिंक्य वडमारे आदिनी केले आहे.

## गल्हाटीच्या हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा एल्गार

# १५ ऑक्टोबरला दोदडगाव फाट्यावर रास्ता रोको ५० गावांच्या भवितव्यासाठी संघर्ष समितीचे आंदोलन

अंबड ।प्रतिनिधी

गल्हाटी मध्यम प्रकल्पाला हक्काचे व मंजूर पाणी मिळावे उपलब्ध पाण्याच्या नियोजनात गल्हाटी प्रकल्पाला न्याय मिळावा आणि कायमस्वरूपी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासनाने ठोस कृती आराखडा जाहीर करावा या मागण्यांसाठी गल्हाटी धरण संघर्ष समिती व शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवार दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील दोदडगाव फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनाच्या माध्यमातून परिसरातील शेतकरी मच्छीमार युवक महिला आणि ग्रामस्थांनी एकजुटीने आपल्या पाण्याच्या हक्कासाठी आवाज उठवावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.गल्हाटी मध्यम प्रकल्पाच्या पाण्याचा प्रश्न हा केवळ सिंचनापुरता मर्यादित नसून परिसरातील शेती रोजगार आणि अनेक गावांच्या भवितव्याशी जोडलेला असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे. पाण्याअभावी शेतीसमोरील अडचणी वाढत असताना मंजूर पाण्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा उपलब्ध पाण्याच्या नियोजनात गल्हाटी प्रकल्पाला योग्य न्याय मिळावा आणि या प्रश्नावर केवळ आश्वासनांऐवजी ठोस निर्णय व्हावा अशी मागणी पुढे येत आहे.आश्वासनांपलीकडे जाऊन ठोस निर्णयाची मागणी गल्हाटी मध्यम प्रकल्पासाठी मंजूर असलेले हक्काचे पाणी उपलब्ध करून देणे पाणीवाटपाच्या नियोजनात न्याय्य भूमिका घेणे आणि पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी कालबद्ध कृती आराखडा जाहीर करणे या प्रमुख मागण्यांसाठी संघर्ष समितीने आंदोलनाची हाक दिली आहे.शासन व संबंधित प्रशासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन पाणीप्रश्नावर तातडीने निर्णय घ्यावा अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.५० गावांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवरपाणी म्हणजे शेती पाणी म्हणजे रोजगार आणि पाणी म्हणजे ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा आधार. त्यामुळे गल्हाटी प्रकल्पाच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळावा यासाठी लोकसहभागातून आंदोलन अधिक व्यापक करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता दोदडगाव फाटा येथे होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनात शेतकरी मच्छीमार युवक महिला व सर्व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.आंदोलन शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडावे असे आवाहन गल्हाटी धरण संघर्ष समिती शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान तसेच समस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

गल्हाटीला हक्काचे पाणी द्या ५० गावांच्या भवितव्याला न्याय द्या हा संदेश घेऊन होणाऱ्या या आंदोलनाकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शालार्थ आयडी घोटाळा ;एसआयटीच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह

## तक्रारदाराला डावलून अधिकाऱ्यांना अभय? वर्षाताई जगदाळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील कथित शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशीवरून आता नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) कार्यपद्धतीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्षा वर्षाताई जगदाळे यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तक्रारदाराने सुमारे २०० पानांचे पुरावे सादर करूनही अद्याप त्यांचा लेखी जबाब नोंदवण्यात आलेला नाही किंवा चौकशीचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही, असा आरोप त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

बीड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागातील कथित शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी वर्षाताई जगदाळे यांनी संबंधित यंत्रणेकडे सुमारे २०० पानांचे पुरावे आणि तक्रार सादर केली आहे. या तक्रारीची दखल घेत शिक्षण आयुक्तांनी तातडीने विशेष चौकशी समिती स्थापन केली. मात्र, समितीचे अध्यक्ष अद्याप बीडमध्ये आलेले नसल्याचा दावा जगदाळे यांनी केला आहे.तसेच, तक्रारदार आणि ज्यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली आहे, अशा दोन्ही बाजूंचे लेखी जबाब नोंदवण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही तक्रारदाराचा जबाब नोंदवण्यात आलेला नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात चौकशी करणाऱ्या एसआयटीने तीन दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना देऊनही अद्याप अहवाल सादर केलेला नसल्याचा आरोप वर्षाताई जगदाळे यांनी केला आहे. तक्रारदाराला बाजू मांडण्याची संधी न देता, ज्यांच्याविरोधात तक्रार आहे त्या अधिकाऱ्यांसोबतच चर्चा करून एकतर्फी अहवाल सादर करण्याच्या हालचाली सुरू असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमलेले एसआयटी पथकच संबंधितांना निर्दोष मुक्त करण्याच्या दिशेने काम करत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे एसआयटीच्या चौकशीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, अशी भूमिका वर्षाताई जगदाळे यांनी मांडली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपसंचालक कार्यालय समोर जागरण-गोंधळ आंदोलन करणार.!

शालार्थ आयडी घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच तक्रारदाराचा लेखी जबाब नोंदवून चौकशीचा अहवाल तातडीने सादर करावा, अशी मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.या प्रकरणी योग्य कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उपसंचालक कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते दौलतराव कदम यांच्ये दिर्घ आजाराने निधन



नवीन नांदेड -महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या सिडको येथील जेष्ठ वृत्तपत्र विक्रेते दौलतराव शेषराव कदम यांच्ये दिर्घ आजाराने वयाच्या ६२ वर्षी १२ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी निधन झाले असून पश्चात पत्नी एक मुलगा, दोन मुली जावई नातवंडे असा परिवार असून त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ५ वाजता सिडको स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष सतिश कदम यांच्ये ते वडील होत.





नवीन नांदेड - सिडको हडको परिसरासह ग्रामीण भागातील सार्वजनिक दुर्गा मंडळांनी रात्री उशिरापर्यंत ढोल ताशांच्या व गरबाचा गजरात विधीवत पूजन करून नवदुर्गाची विधीवत स्थापना केली असून ग्रामीण पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण व शहरी भागात कडेकोट पोलीस बंदोबस्त मुख्य मार्गावर ठेवण्यात आला..

ग्रामीण पोलीस स्टेशन हदतील शहरी भागात ऑनलाईन परवानगी ३७ तर विना परवाना ४७ अशा एकूण ८४ मंडळांनी नोंद केली आहे तर व ग्रामीण भागातील ऑनलाईन २५ व विना परवाना ५५ सार्वजनिक दुर्गा मंडळांनी विनापरवाना नोंद केली असून एकुण १६४ सार्वजनिक दुर्गा मंडळांनी नोंद केली आहे, सार्वजनिक दुर्गा महोत्सव मंडळांनी ठिकाणी रोषणाई सजावट कमानी व गरबा खेळण्यासाठी मैदाने रोषणाई सजावट करण्यात आली तर सिडको हडको भागासह जुना कौठा बालाजी मंदिर येथे वार्षिक ब्रम्होत्सवाला ११ ऑक्टोबर पासून सुरूवात करण्यात आली आहे यावेळी विधीवत पूजा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत.

# राज्यातील हजारो शिक्षकांचे पगार १ नोव्हेंबरपासून ठप्प होणार ?

## संचमान्यतेपेक्षा अधिकच्या पदांवरील कर्मचाऱ्यांना फटका

शालार्थमधील त्रुटी दूर करण्यासाठी ऑक्टोबर अखेरची अंतिम मुदत

मुंबई : राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली असून, संचमान्यतेनुसार मंजूर पदांपेक्षा अधिकच्या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन १ नोव्हेंबर २०२६ पासून अदा केले जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शालार्थ प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षण विभागाने ऑक्टोबरअखेरची अंतिम मुदत दिली आहे. निर्धारित मुदतीत आवश्यक दुरुस्त्या न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

शालार्थ प्रणालीतील नोंदी, संचमान्यता आणि प्रत्यक्ष कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तपशिलात तफावत आढळून येत असल्याने वेतन वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२६ या दोन महिन्यांसाठी मंजूर पदांपेक्षा अधिकच्या पदांवरील कर्मचाऱ्यांचे वेतन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने अदा करण्याची सवलत देण्यात आली होती. मात्र, ही सवलत ऑक्टोबरअखेर संपणार असून, नोव्हेंबरपासून नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार आहे.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी यासंदर्भात निर्देश दिले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ आणि २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार १ एप्रिल २०२६ पासून मंजूर पदांपेक्षा अधिकच्या पदांवरील कर्मचाऱ्यांचे वेतन विशेष मान्यतेने अदा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

ऑक्टोबरअखेरच्या मुदतीकडे लक्ष

१ नोव्हेंबर २०२६ पासून वेतन वितरणाबाबत कठोर अंमलबजावणी होणार असल्याने संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लक्ष आता शिक्षण विभागाच्या पुढील कार्यवाहीकडे लागले आहे. मुदतीपूर्वी आवश्यक प्रक्रिया पूर्ण न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षकांचे वेतन वेळेत अदा होण्यासाठी शालार्थ प्रणालीतील त्रुटी दूर करणे आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### अनेक कारणांमुळे वेतनाचा प्रश्न

अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन रखडणे, डिजिटलायझेशन प्रक्रियेत आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असणे, जन्मतारीख आणि रुजू दिनांकाच्या नोंदींमध्ये चुका, संचमान्यता व शालार्थ प्रणालीतील यूडायस क्रमांकात तफावत, शाळा बंद होणे तसेच न्यायालयीन प्रकरणे अशा विविध कारणांमुळे वेतनाबाबतची सवलत देण्यात आली होती.

सणासुदीचा कालावधी आणि प्रशासकीय कामकाजातील अडचणी लक्षात घेऊन सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्यांसाठीच ही मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित शाळा व्यवस्थापन आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना शालार्थ प्रणालीतील त्रुटी, कागदपत्रांची पूर्तता आणि नोंदींमधील तफावत तातडीने दूर करावी लागणार आहे.

# महाराष्ट्रात पाऊस पुन्हा परतणार!१३ नोव्हेंबर रोजी थंडीला सुरुवात होईल

सध्या राज्यात पावसाने दडी मारलीय. शेतकऱ्यांच्या हातातून खरीप हंगाम गेलाय. पाऊस नसल्याने मराठवाडा, विदर्भात विहिरी कोरड्या पडल्या आहेत. राज्य सरकारने राज्यात दुष्काळ जाहीर केलाय. त्यानुसार शेतकऱ्यांना मदत केली जात आहे. दरम्यान, खरीब हंगाम शेतकऱ्यांच्या हातातून गेलेला असला तरीही रबी हंगाम अद्याप बाकी आहे. रबी हंगामाच्या पेरण्या होण्यासाठी तरी राज्यात पाऊस यावा, अशी आशा शेतकरी लावून बसले आहेत. असे असतानाच आता हवामानाची माहिती देणारे पंजाबराव डख यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. दसऱ्यानंतर राज्यात पाऊस येऊ शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केलाय.

राज्यात परतीचा पाऊस येणार आहे. हा पाऊस शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा असेल. एकूण चार दिवस दिवस हा पाऊस असेल. २१ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबरपर्यंत पासवाचा राज्यात मुक्काम असेल. या काळात रोज राज्यातील वेगवेगळ्या भागात पाऊस पडेल. परतीचा पाऊस येणार आहे. त्यामुळे रब्बीच्या पेरण्या होतील. परतीचा हा पाऊस निर्णायक असेल, असं डख यांनी सांगितलंय.

# मुंबईत सीजेपी आंदोलनावरून राडा! आदित्य ठाकरेंचा पोलिसांना थेट इशारा

# ‘महाराष्ट्र बंद पाडू!

मुंबई : कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावरून मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेतल्याचे चित्र समोर आले. शिवाजी पार्क परिसरात भाजपविरोधात घोषणाबाजी करण्यात आली, तर शिवसेना भवनासमोर पोलिसांनी शिवसैनिकांना रोखल्यानंतर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला. ‘शिवसैनिकांना हात लावाल, तर महाराष्ट्र बंद पाडू,’ असा इशारा त्यांनी पोलिसांना दिल्याचे वृत्त आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी सीजेपीकडून दिल्लीत आंदोलन सुरू असल्याचे सांगितले जात आहे. याच आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईतील शिवाजी पार्क परिसरातही सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवत आंदोलकांना ताब्यात घेतले. या घडामोडींमुळे मुंबईतील राजकीय वातावरण तापले.

शिवसैनिकांना पोलिसांनी ताब्यात घेऊ नये, अशी मागणी करत आदित्य ठाकरे यांनी शिवसेना भवनासमोर ठिय्या मांडला. यावेळी त्यांच्यासोबत तेजस ठाकरे आणि आमदार अनिल परबही उपस्थित होते. पोलिसांनी शिवसैनिकांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यानंतर आदित्य ठाकरे अधिक आक्रमक झाले.



शिवसैनिकांवर कारवाई करू नये, अशी भूमिका घेत त्यांनी पोलिसांना इशारा दिला. यावेळी आमदार अनिल परब यांनीही पोलिसांच्या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शिवसैनिकांना घेऊन जाणारी पोलीस व्हॅन आदित्य ठाकरे यांनी अडवल्याचे वृत्त आहे. ते पोलीस व्हॅनच्या दरवाजावर चढल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. शिवसैनिकांनीही पोलिसांची गाडी अडवली.

सुमारे १० ते १५ मिनिटे हा गोंधळ सुरू होता. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या शिवसैनिकांना सोडून दिल्याची माहिती आहे.